परमपिता शिव परमात्मा

# अमृत कुंभ




वर्ष १३ | अंक ४ | ऑक्टोबर - नोव्हेंबर २०१९ | मूल्य रु. १३/-



मुलुंड (मुंबई) : रक्षाबंधन सोहळ्यात उपस्थित डॉ. मंजू शाह, राजयोगिनी गोदावरी दीदी, ब्र. कु. वर्षा बहेन व समाजसेवक श्री. तन्ना.



उस्मानाबाद : 'व्यसनमुक्ती समुपदेशन' ट्रेनिंगचे उद्घाटन करतांना सिव्हील सर्जन डॉ. गलांडे, ब्र. कु. डॉ. सचिन परब, राजयोगिनी सोमप्रभा दीदी व अन्य.



मालाड (शगुन) : आय. एन्. एस. हमला, कमांडर श्री. माथारु यांना राखी बांधल्यानंतर ग्रुप फोटोत ब्र. कु. कुंती बहेन व निरजा बहेन.



चंद्रपूर : लॉ कॉलेजमध्ये तणावमुक्त जीवन या कार्यक्रमात उपस्थित डॉ. सचिन परब, ब्र. कु. कुंदा बहेन, डॉ. अंजली हस्तक व ब्र. कु. प्रसाद.



पिंपरी (पुणे) : खासदार श्री. श्रीरंग बारणे यांना राखी बांधतांना ब्र. कु. सुरेखा बहेन.



वर्धा : आमदार श्री. पंकज भोयर यांना राखी बांधल्यानंतर भेटवस्तू देतांना ब्र. कु. माधुरी बहेन.



ठाणे (पू.) : श्री. हेमंत पमनानी व सौ. नम्रता पमनानी (नगरसेविका) यांना राखी बांधतांना ब्र. कु. मीनाक्षी बहेन.



अहमदनगर : सुप्रसिद्ध समाजसेवक श्री. अण्णा हजारे यांना राखी बांधतांना ब्र. कु. सुप्रभा बहेन, शेजारी ब्र. कु. साधना बहेन.

परमपिता परमात्मा त्रिमुर्ती शिवभगवानुवाच ‘मन्मनाभव’।

# अमृत कुंभ

वर्ष १३, अंक ४. ऑक्टोबर – नोव्हेंबर २०१९

## मुखपृष्ठाविषयी

दीपावली महोत्सवाला साधनेच्या दृष्टिकोनातून ‘महारात्री’ असेही म्हटले जाते. अनेक साधक या रात्री जागून, आपल्या मंत्राची साधना करतात. वास्तविक ही मान्यता देखील कलियुगाच्या अंति असलेल्या अज्ञान रात्रीच्या संबंधित आहे. कलियुगाच्या या तमोप्रधान अंतिम चरणात जे कोणी परमात्मा द्वारा प्राप्त श्रीमतानुसार साधना करतात, त्यांना सर्व सिद्धी प्राप्त होतात. हाच भाव मुखपृष्ठावरील चित्रात दर्शविण्यात आला आहे.

परमपिता शिव परमात्मा दिव्य ज्योति पुंज आहे. त्याच्या सभोवती फिरणारे पतंग हे त्याच्यावर आकर्षित होणाऱ्या आत्म्यांचे प्रतीक आहे. त्यातील काही थोडे आत्मे हे पूर्णतः श्रीमतावर चालून, परमात्म्यावर समर्पित होतात अर्थात बलिहार जातात. त्याचेच प्रतीक, ज्योतिवर जळणाऱ्या पतंगांचे आहे. म्हणूनच गायन केले जाते – ‘परवाने शमा पर फिदा हो जाते है ...’ तात्पर्य म्हणजे आपणसुद्धा परमात्मा शिव पित्याच्या श्रीमतावर चालून श्रीलक्ष्मी–नारायण समान बनू या.

– प्रकाशक अमृतकुंभ

## अंतरंग





| | |
|---|---|
| १) सत्य ज्ञानाद्वारे एकरस आनंदाची प्राप्ती | २ |
| २) दीपावली अर्थात आनंदोत्सव (संपादकीय) | ४ |
| ३) निश्चयबुध्दि विजयन्ति ... संशयबुध्दि विनश्यन्ति ! | ८ |
| ४) पाच स्वरुपांचे चिंतन (कविता) | ११ |
| ५) कर्मयोगी जीवन | १२ |
| ६) सचित्र सेवावृत्त | १५ |
| ७) जैसे ज्याचे कर्म तैसे फळ देतो ईश्वर | १९ |
| ८) यथार्थ सेवेची विधी | २२ |
| ९) संगमयुगी ब्राह्मण जीवनात प्राप्त करावयाच्या सोळा कला (भाग १) | २४ |
| १०) रामराज्य व रावणराज्य (कविता) | २७ |
| ११) जेथे जाते तेथे, शिवबाबा सांगाती (अनुभव) | ३० |


**फोटो, लेख आदी पाठविण्याचा पत्ता :**
संपादक – अमृतकुंभ, द्वारा : प्रजापिता ब्रह्माकुमारीज्
ए–१०, वर्षा अपार्टमेंट, छत्रपती शिवाजी सोसायटी,
कोपरी कॉलनी, ठाणे (पूर्व)–४००६०३
फोन : ०२२–२५३२२२०८
E-mail : info@amrutkumbh.com

**वर्गणी पाठविण्याचा पत्ता :**
बी.के. गोदावरी, प्रकाशक अमृतकुंभ
द्वारा : प्रजापिता ब्रह्माकुमारीज्, ए–१०, वर्षा अपार्टमेंट, छत्रपती शिवाजी सोसायटी, कोपरी कॉलनी, ठाणे (पूर्व) – ४००६०३ मोबाईल : ९८२००२३०९२

प्रजापिता ब्रह्मा कुमारी ईश्वरीय विश्व विद्यालयाचे मुखपत्र ‘अमृतकुंभ’ द्वैमासिक मुद्रक व प्रकाशक बी.के. गोदावरी यांनी परफेक्ट प्रिंटस्, २२ ज्योती इंडस्ट्रियल इस्टेट, नुरीबाबा दर्गा रोड, ठाणे (पश्चिम) – ४००६०१ येथे छापून प्रजापिता ब्रह्माकुमारीज्, लाईट हाऊस, वागळे इस्टेट, ठाणे (पश्चिम) – ४००६०४ येथे प्रसिद्ध केले. संपादक ब्र. कु. शिवाजी चौधरी.

**वार्षिक वर्गणी रु. ७५/–, आजीव सभासद वर्गणी रु. १,४००/–**

E-magazine साठी पुढील संकेतस्थळाला (वेबसाईटला) भेट द्या – www.amrutkumbh.com.



# सत्य ज्ञानाद्वारे एकरस आनंदाची प्राप्ती

**आदरणीय वरिष्ठ भ्राता राजयोगी ब्रह्माकुमार जगदीशभाईजी**

प्रत्येक गोष्ट जी सत्य व पवित्र आहे मानवाला ती प्राप्त करून घ्याविशी वाटते. परंतु सत्य आणि असत्य यांची कसोटी कोणती हे माहित नसेल तर प्राप्त झालेल्या वस्तूचा खरेखोटेपणा त्याला कसा कळणार? आज सुख शांतीच्या शोधात माणूस अनेक धार्मिक स्थळी वा आश्रमांमध्ये जाऊन ज्ञानचर्चा ऐकतो. विविध धर्मग्रंथ वाचतो. त्यात आढळणाऱ्या काही परस्परविरोधी विधानांमुळे साहजिकच त्याला प्रश्न पडतात. सत्य ज्ञानाची कसोटी माहित नसेल तर आपण ऐकतो आहोत तेच खरं ज्ञान आहे किंवा नाही ते ठरवता येत नाही. काय धारण करावे, काय सोडून द्यावे असा पेच पडतो.

**परंतु सत्य ज्ञानाच्या प्राप्तीने किर्ती, प्रीती, रीती, नीती व 'बीती' म्हणजेच भूतकाळ इ.विषयी माणसाचा दृष्टिकोन कसा बनतो ते पाहूया. तसेच सदैव एकरस आनंदमय स्थितीमध्ये राहण्यासाठी काही गोष्टी जाणून घेऊया.**

**१. किर्ती :**

आजचा मानव ज्या व्यक्तीला चांगलं मानतो त्याच्याच मोठेपणाचं गायन करतो. मग कधी तो मित्र असतो, कधी एखादा नेता किंवा मग विद्वान, पंडित. कोणी श्रीकृष्णाला पुरूषोत्तम मानून त्याचं महात्म्य वर्णन करतात. कोणी गौतम बुद्धांची तर कोणी येशूची महिमा गातात. परंतु श्रीकृष्ण, श्रीरामासारख्या सगळ्या श्रेष्ठ देवात्म्यांनी व धर्मस्थापकांनीही निराकार, ज्योतिस्वरूप परमात्म्याला आपला सर्वोच्च पिता मानलं. ब्रह्मा, विष्णू, शंकराचाही रचयिता, सृष्टीच्या आदि-मध्य-अंताचे सत्य ज्ञान असलेला, सर्वांना सुख, शांतीचा वारसा देणारा, मुक्ती-जीवनमुक्तीचा दाता एक परमात्मा आहे. म्हणूनच सत्य ज्ञान मानवाला त्या एकाचं स्मरण व महात्म्य गायन करायला शिकवतं.

**ईश्वर पित्याचं गुणगान करणं म्हणजे उच्च स्वरात केलेलं गायन नव्हे. त्यासाठी मोठमोठ्याने झांजा वाजविण्याची, ढोल बडविण्याचीही आवश्यकता नाही. सत्य ज्ञान सांगतं की स्वतःमध्ये ईश्वरीय गुणांची धारणा करून पवित्र आचरण ठेवणं हे त्याचं खरं गायन आहे.** अनुभवातून सिद्ध झालंय की माणूस एखादे वेळी ज्या व्यक्ती, वस्तू अथवा गुणाचं एकाग्रतेने स्मरण करतो, त्या क्षणी त्याची मनःस्थिती किंवा आत्मानुभव तसाच असतो. आज माणूस स्वतःचंच कौतुक करून घेऊ इच्छितो किंवा एखाद्या नेत्याचं, साधू, संतांचं महात्म्य वर्णन करण्यात धन्यता मानतो. परंतु कलियुगात सर्व समाज विकारी पतित बनला आहे. ज्यामुळे संपूर्ण सत्त्वप्रधान अवस्था कोणाचीही नाही. मग प्रश्न पडतो की आपली स्थिती एकरस रहावी म्हणून कोणाचं स्मरण करायचं? वास्तविक ज्ञान, गुण, शक्तींचा सागर, सदैव निजानंदस्वरूप असा एकच परमात्मा आहे. **सत्य ज्ञान सांगतं की निराकार परमात्म्याच्या गुणांचं मनन, चिंतन व धारणा करणारा मानवच एकरस अवस्थेत टिकू शकतो व कालांतराने श्रेष्ठ देवता पदाला पोहोचू शकतो.**

**२. प्रीती :**

ज्यांच्याविषयी प्रेम वाटते त्यांचं अनुकरण करणं हा मानवाचा सहज स्वभाव आहे. आज आपली प्रीती दैहिक नातेसंबंधांमध्ये विखुरली आहे. वास्तविक हा देह आणि दैहिक नाती

दोन्ही विनाशी 'नश्वर' आहेत. लहानाचे मोठे होताना या शरीरातसुद्धा किती बदल घडतात. आजूबाजूच्या व्यक्ती, वस्तू, प्रकृतीदेखील नेहमी एकसमान राहत नाही. विचार करण्यासारखी गोष्ट आहे की ज्यावर माझा अधिकार सदैव नाही आणि ती गोष्ट नेहमीच प्रिय वाटेल असेही नाही, तरीदेखील त्याविषयी मला प्रीती वाटत असेल, तर मनाला सुख कसं लाभेल? **सत्य ज्ञान आपल्याला एका परमात्मा पित्याशी मन बुद्धीने प्रीती जोडण्यासाठी प्रेरणा देते. कारण जन्म मरणाच्या चक्रातून मुक्त असा एकच चैतन्य परमात्मा शिव आहे. त्यासम प्रेमळ,निःस्वार्थी सखा, सहाय्यक, संबंधी इतर कोणीही देहधारी असू शकत नाही. म्हणूनच एकरस आनंदमय स्थितीची अनुभूती घ्यायची असेल तर शिव परमात्म्याशी आत्मिक प्रीतीचं नातं दृढ केलं पाहिजे.**

**३. रीती :**

जोवर सत्य ज्ञान प्राप्त होत नाही तोवर माणसाची आसक्ती त्याच्या स्वतःच्या देहात, आप्त स्वकीयांत, धन दौलतीमधेच असते. त्यामुळे त्याचं मन, वाणी, कर्म सगळं आसक्तीवर आधारलेलं असतं. कुणाच्या जन्मामुळे आनंदी होणारा माणूस दुसऱ्याच्या मृत्यूने शोकाकुल होतो. व्यवसायामधे होणारा नफा तोटा, त्याचं जगणं सुखी किंवा दुःखी करतो. एकरस अवस्था राहत नाही. सत्य ज्ञान मानवाला काम, क्रोध, लोभ, मोह इ. अवगुणांचा त्याग करून अनासक्त भाव धारण करण्याची प्रेरणा देते. अखंड फिरत असलेल्या कालचक्रामध्ये जो तो आपापली भली बुरी भूमिका पार पाडतोय. मला माझा पार्ट सर्वोत्तम बजावायचा आहे. असा दृष्टिकोन ठेवला तर साक्षीद्रष्टा होऊन केलेले संकल्प, बोल, कर्म सगळंच अलौकिक एकरस आनंदाची अनुभूती देतात. सत्य ज्ञानाची प्राप्ती झालेल्या माणसाची कार्यव्यवहाराची रीत आत्मनिश्चयावर आधारित, दैवी गुणांनी संपन्न असते.

**४. नीती :**


इथे नीती म्हणजे समाजात वावरताना माणसाने स्वीकारलेली लोकांशी वागण्याची पद्धत, असा अर्थ अभिप्रेत आहे. कित्येक जण असं मानतात की खोटं बोललं नाही तर व्यवसाय चालणार नाही. घरी, ऑफिसमध्ये वावरताना काम योग्य रीतीने व्हायचे असेल तर क्रोध न करून चालणारच नाही. उत्तम गृहस्थ व्यवहार करायचा म्हणजे मुलांमध्ये, धन संपत्तीमध्ये मोह असणारचं परंतु अशी नीती पवित्रतेवर आधारित नाही.

सत्य ज्ञान आपल्याला जाणीव करून देते की हिंसा, क्रोध, बदला घेण्याची भावना, मोह इ. अवगुण आहेत. कार्य व्यवहार करण्यासाठी त्यांचा वापर करणं ही योग्य नीती नाही कारण एकतर दुसरी व्यक्ती यामुळे दुखावली जाते व स्वतःचं मनसुद्धा अशांत राहतं. म्हणूनच प्रामाणिकपणा, सहनशक्ती, अहिंसा, सरळ स्वभाव माधुर्य, सर्वांबद्दल आत्मियता, मित्रत्वाची भावना, अहंकाराचा स्पर्शही होऊ न देता वागणं हीच योग्य नीती आहे. या पृथ्वीतलावर सुरू असणारा संसाराचा खेळ जणू एक विशाल नाटक आहे. ज्यात खूप वैविध्य आहे. अनेक मत-मतांतरं आहेत, तसेच प्रत्येक व्यक्तीचा आपापला कर्मांचा पार्टही आहे. त्यामुळे या कलियुगात सगळेच आपल्याला पटणाऱ्या विचारांचे असतील असे नाही. **म्हणूनच सत्य ज्ञान प्राप्त केलेल्या मनुष्याच्या कार्य व्यवहाराची नीती बदलून जाते. एकरस आनंदमय स्थितीत राहण्यासाठी 'मी कोणालाही दुःख देणार नाही, तसंच स्वतःही दुःख वाटून घेणार नाही' अशी नीती स्वीकारली पाहिजे.**

**५. बीती (जे घडून गेलं) :**

भूतकाळात काम, क्रोधादी विकारांमुळे आपल्या हातून जे पापकर्म घडलं त्याचाच पुन्हापुन्हा विचार करत राहिल्यास माणूस कधीच सुखी राहू शकत नाही. गेलेला क्षण कधीही परत येणार नाही. परंतु तरीही अमुक एकाने मला त्रास दिला होता किंवा त्या व्यक्तीचं त्या वेळचं बोलणं योग्यच नव्हतं, अशाप्रकारे भूतकाळातील घटनांची आपण उजळणी करत राहतो. त्यामुळे मग वर्तमानातील आनंदावरही

**(पान क्र. ७ वर)**




(संपादकीय)

# दीपावली अर्थात आनंदोत्सव

दीपावली अर्थात दीपोत्सव, अज्ञानरुपी अंधःकार नष्ट करून अवघे विश्व ज्ञान प्रकाशाने उजळून टाकण्याचा हा उत्सव. दीपावली अर्थात नकारात्मकता व निराशा नष्ट करून जीवनात सकारात्मकता व आशा धारण करण्याचा हा उत्सव. दीपावली अर्थात स्वतःची आत्मज्योति प्रज्वलित करून दुसऱ्याची आत्मज्योति जागविण्याचा हा उत्सव. दीपावली अर्थात आपला जुना हिसाब-किताब (लेखाजोखा) समाप्त करून, नवीन सुखद संबंधांचा हिसाब-किताब सुरु करण्याचा हा उत्सव. दीपावली अर्थात शत्रुला देखील मित्र बनविण्याचा अर्थात शत्रुता विसरून मित्र बनविण्याचा उत्सव. दीपावली अर्थात भूतकाळातील वाईट गोष्टींना पूर्णविराम देऊन, नवीन चांगल्या गोष्टींची सुरुवात करण्याचा उत्सव. दीपावली अर्थात संबंधात स्नेह व सन्मानाची उधळण करून, संबंधांच्या गाठी मजबूत करण्याचा उत्सव. **दीपावली अर्थात स्वतःची आत्मज्योति जागवून 'सत्-चित्-आनंद' स्वरुपाचा अनुभव करविणारा तसेच दुसऱ्यांची देखील आत्मज्योति जागवून त्यांना खरा आनंद प्रदान करणारा असा हा आनंदोत्सव. त्यामुळे यावर्षी आपण अनेक आत्म्यांची आत्मज्योति जागवून, खऱ्या अर्थी दीपावली साजरी करु या.**

दिपावलीचा उत्सव आश्विन अमावस्येला साजरा केला जातो. सध्याची परिस्थितीसुद्धा अमावस्येसारखीच अंधःकारमय आहे. महाराष्ट्रातील कोल्हापूर, सातारा व सांगली जिल्ह्यात तसेच भारतातील बऱ्याच राज्यात ठिकठिकाणी महापूरामुळे सर्वसामान्य जनतेचे अतोनात नुकसान झाले आहे. लाखो-करोडो लोकांचे संसार उध्वस्त झाले आहेत. रहायला घर नाही, खायला अन्न नाही, घालायला धड कपडे नाहीत. हातांना काम नाही, दैनंदिन जीवन जगण्यासाठी पुरेसा पैसा नाही. अशा भीषण परिस्थितीत आपले बांधव दिवाळी साजरी तरी कशी करणार? श्री साईबाबांच्या जीवन कथेतील अशा प्रकारचा एक हृदयस्पर्शी प्रसंग आपण सर्व जाणतो. एका गरीब घरातील मुलीकडे दिवाळीच्या दिवशी दिवे लावण्यासाठी तेल नसते. तेव्हा ती साईबाबांकडे जाते. साईबाबा त्यात पाणी टाकून आपल्या आध्यात्मिक शक्तीने दिवे पेटवतात. त्यावेळी ती मुलगी मोठ्या आनंदाने गीत गाते - 'दिपावली मनाये सुहानी, मेरे साई के हाथो में जादू का पानी' तात्पर्य म्हणजे **आता केवळ 'हे प्रभु! मेरा तू ही सहारा' अशी परिस्थिती आहे. आज जरी अशी परिस्थिती काही लोकांच्या जीवनात असली तरी दिवसेंदिवस तिची व्याप्ती वाढतच जाणार आहे. त्यामुळे आपण प्रत्येकाने अलौकिक खरी दिवाळी कशी साजरी करावी, हे समजून घेणे आवश्यक आहे.** दिपावली या चार अक्षरात जे आध्यात्मिक ज्ञानाचे सार सामावलेले आहे, ते या प्रस्तुत लेखात आपण पाहू या व आपल्या जीवनात सदैव आनंदोत्सव साजरा करु या.

### दिव्य बुद्धी व दिव्य नेत्र प्रदान करणारी दिपावली

दीपावली या शब्दातील पहिले अक्षर आहे 'दी' अर्थात दिव्य बुद्धी व दिव्य नेत्र प्रदान करणारा महोत्सव. दिपावली अमावस्येला साजरी केली जाते. अमावस्या ही अज्ञान अंधःकाराचे प्रतीक आहे. अशावेळी जेव्हा सृष्टीवर सर्वत्र अज्ञान अंधःकार परसरलेला असतो अर्थात कलियुगाचे अंतिम

समयी, परमपिता शिव परमात्मा अवतरित होऊन, सर्व आत्म्यांना दिव्य बुद्धी व दिव्य नेत्र प्रदान करतात. दिव्य बुद्धीद्वारे आपण दिव्य ज्ञान (रचयिता व रचनेच्या आदि-मध्य-अंताचे ज्ञान), दिव्य याद (राजयोग) व दिव्य गुणांची धारणा स्वरुप बनतो. **दिव्य बुद्धीने आपण श्रीमत अर्थात ईश्वरीय मत धारण करून, सदा समर्थ मास्टर सर्वशक्तिवान स्थितीचा अनुभव करतो. दिव्य बुद्धीरुपी विमानात बसून आपण तिन्ही लोकांची (स्थूल वतन, सूक्ष्म वतन व मूल वतन) यात्रा करू शकतो. दिव्य बुद्धीलाच संपूर्ण सत्त्वप्रधान बुद्धी असेही म्हटले जाते, जिच्याद्वारे सदैव आनंदमय स्थितीचा अनुभव होतो.**

दिव्य दृष्टी अर्थात तिसऱ्या नेत्राद्वारे आपण सूर्य, चंद्र, तारे यांच्याही पलिकडे असलेल्या परमधामाचा समीप व स्पष्ट अनुभव करू शकतो. याद्वारे आपण तिन्ही लोक व तिन्ही काळ पाहू शकतो. म्हणूनच दिव्य नेत्राला अनुभवाचा नेत्र असेही म्हटले जाते. याद्वारे आपण ५००० वर्षाची गोष्ट इतकी सहज पहातो जणू ती कालची गोष्ट आहे. फलस्वरुप आपण अनुभव करतो की सत्ययुगात आपण पूज्य देवता होतो आता पुन्हा बनत आहोत. आज ब्राह्मण आहोत उद्या देवता अवश्य बनू. 'हमसो-सोहम्' (अर्थात हम सो देवता, देवता सो हम) या मंत्राचे यथार्थ ज्ञान प्राप्त झाल्याने अपार खुशीचा अनुभव होतो. याविषयी एका कवीने म्हटले आहे -

**ज्ञान घृताने भिजवुनी आमुच्या, आत्मदिपांच्या वाती।**

**सहज राजयोगाग्नीद्वारे, चेतवी शिव त्या ज्योती।**

**स्वये पूजनीय देवता होता वसुंधरा होई स्वर्गपुरी।**

**आत्मदीप हा उजळुनी करुया, आज दिवाळी साजरी।।**

अशी ही अलौकिक खरी दिवाळी आपण साजरी करुया म्हणजे आपले जीवन आत्म्याच्या मूलभूत सप्तरंगानी (अर्थात पवित्रता, सुख, शांती, आनंद, प्रेम, ज्ञान व शक्ती या सात गुणांनी) उजळून जाईल.

### पावनतेची स्मृती प्रदान करणारी दीपावली

दीपावली या शब्दातील दुसरे अक्षर आहे 'पा' अर्थात पावनतेची स्मृती देणारा महोत्सव. आपण सत्ययुगात पावन देवीदेवता होतो याची स्मृती देणाऱ्या दिवाळी सणातील महत्त्वाचा दिवस म्हणजे श्रीलक्ष्मी पूजनाचा. संपूर्ण भारतात या दिवशी सर्वमंगल श्रीलक्ष्मीची पूजा केली जाते. दरवर्षी दिवे लावून श्रीलक्ष्मीचे आवाहन केले जाते. परंतु तरीदेखील भारतीयांवर श्रीलक्ष्मी प्रसन्न का होत नाही. असा कोणता दीपक पेटविलेला नसल्यामुळे तिचे आगमन होत नाही? तो दीपक आहे आत्मदीपक.

वर्तमान समयी दिव्य ज्योतिपुंज परमात्मा शिव पिता, आत्मारुपी मुलांना सांगत आहेत, 'प्रिय वत्सांनो, जर तुम्ही तुमचे आत्मारुपी दीपक माझ्या दिव्य ज्योतिने प्रज्वलित कराल तर लवकरच या सृष्टीवरील अज्ञान अंधःकार नाहिसा होईल आणि या सृष्टीवर पुन्हा श्रीलक्ष्मी नारायणाचे साम्राज्य स्थापन होईल.' याचेच गायन भक्तिमार्गात केले जाते - 'नर ऐसी करनी करे, जो नर से श्रीनारायण बने और नारी ऐसी करनी करे, जो नारी से श्रीलक्ष्मी बने।' तात्पर्य म्हणजे यावर्षी दीपावलीच्या पावन पर्वात केवळ श्रीलक्ष्मीचे आवाहन न करता, कमलासनधारी श्रीलक्ष्मीप्रमाणे कमल सदृष्य पावन (अर्थात संपूर्ण निर्विकारी) बनण्याचा दृढ संकल्प करु या.

या अनुषंगाने परमात्मा शिव पित्याची पुढील महावाक्ये अतिशय बोधप्रद आहेत, **''मीठे बच्चे, अभी तुम सभी पतित हो, मैं ही आकर पावन बनाता हूँ। तुम आत्मा जो पतित बनी हो, पावन बनने लिए अब सिर्फ मुझ पतित-पावन बाप को याद करो।'' यावरून आपल्या लक्षात आले असेल की पतित-पावन केवळ एक परमात्मा शिव पिता आहे.** अन्य कोणीही देवता नाही. तसेच गंगा देखील पतित पावनी नाही. हे यथार्थ ज्ञान भक्तिमार्गात नसल्याने सर्व आत्मे दिवसेंदिवस अधिक पतित बनत जातात. म्हणूनच भक्तिमार्गात आपण पुकारत असतो, 'हे पतित-पावन आओ, आकर हमे पावन बनाओ।'

**‘वर्सा’ (वारसा) प्राप्तीची अपार खुशी देणारी दीपावली**

दीपावली या शब्दातील तिसरे अक्षर आहे ‘व’ अर्थात व वर्सा (वारसा). जसा आपल्याला लौकिक पित्याकडून हद्दचा एक जन्माकरिता ‘वर्सा’ (वारसा) प्राप्त होतो. तसाच पारलौकिक परमात्मा शिव पित्याकडून आपल्याला बेहदचा अर्थात संपूर्ण कल्पाकरिता ‘वर्सा’ (वारसा) प्राप्त होतो. सत्ययुग व त्रेतायुगात आपण देवीदेवता बनतो. तेथे आपल्याला अविनाशी सुख-शांतीची प्राप्ती होते. म्हणूनच त्याला स्वर्ग वा सुखधाम असे म्हटले जाते. त्यानंतर द्वापर व कलियुगातील ६३ जन्मातही आपल्याला सद्भाग्याची प्राप्ती होते. भक्तिमार्गात जड मूर्तीच्या रुपाने आपलीच पूजा केली जाते. परंतु हे सत्य आपल्याला त्रिकालदर्शी, ज्ञानसागर परमात्म्याकडून आता ज्ञात होते. सत्ययुगात श्रीलक्ष्मी-नारायण जे विश्वमहाराणी-विश्वमहाराजन् होते तेच अंतिम ८४ व्या जन्मात मम्मा-बाबा (पिताश्री ब्रह्माबाबा) बनतात. तसेच संगमयुगातील तीव्र पुरुषार्थाद्वारे ते पुन्हा श्रीलक्ष्मी-श्रीनारायण बनतात. म्हणूनच भक्तिमार्गात श्रीविष्णुच्या नाभीतून ब्रह्मा निघाले, असे चित्र दर्शविण्यात येते. याठिकाणी श्रीविष्णु हे श्रीलक्ष्मी व श्रीनारायणाचे कम्बाइण्ड (एकत्रित) रुप असून, ते पवित्र प्रवृत्तीमार्गाचे प्रतीक आहे. **तात्पर्य म्हणजे हीच ती वेळ आहे. जेव्हा आपण परमात्मा शिव पित्याकडून अविनाशी सद्भाग्याचा वारसा (जन्मसिद्ध अधिकार) प्राप्त करू शकतो. त्यामुळे आपणही मम्मा-बाबांना फॉलो करून, श्रेष्ठतम वारसा प्राप्त करू या.** आता भारतवासियांचे ८४ जन्म पूरे झाले आहेत. त्यामुळे परमात्मा पिता आपल्याला मनुष्यापासून देवता अर्थात नर्कवासी मनुष्यापासून स्वर्गवासी देवता बनवित आहे. गुरु ग्रंथसाहेबमध्ये सुद्धा गायन केले जाते - ‘मनुष्यसे देवता किये करत न लागी वार।’ म्हणूनच परमात्म्याला जादूगर असेही म्हटले जाते. नर्काला स्वर्ग बनविणे हा जादूचा खेळच आहे ना!

**‘ली’ अर्थात (लव) लीन स्थितीची स्मृती देणारी दीपावली -**

दीपावली या शब्दातील अंतिम अक्षर आहे ‘ली’ अर्थात लीन परंतु लवलीन. भक्तिमार्गात म्हटले जाते की आत्मा परमात्म्यात लीन झाला. यालाच ‘मोक्ष’ असेही म्हटले जाते. परंतु प्रत्येक आत्मा हा अनादि, अविनाशी असल्याने त्याचा पार्टही अनादि, अविनाशी आहे. त्यामुळे कुठलाही आत्मा हा कधीच परमात्म्यात लीन होत नाही. अर्थात कायमचा सामावून जात नाही. प्रत्येक आत्म्याला आपला निर्धारित पार्ट हा बजवावाच लागतो. **याऐवजी संगमयुगातील आपली अंतिम स्थिती आहे - लवलीन स्थिती. आपण प्रेमसागर शिवबाबांच्या मधुर स्मृतीत सदैव लवलीन स्थितीचा अनुभव करतो अर्थात परमात्म प्रेमात सामावून जातो. ‘मेरा तो एक शिवबाबा दुसरा न कोई’ अशी आपली स्थिती बनते.** अशा या लवलीन स्थितीमुळे आपण संगमयुगात मुक्ती व जीवनमुक्ती या दोन्ही स्थितींचा अनुभव करतो. देह व देहाच्या दुनियेचा पूर्णतः विसर पडणे अर्थात त्यांच्या स्मृतीपासून मुक्त होणे ही मुक्ती होय. तसेच देह व देहाच्या दुनियेच्या आकर्षणापासून मुक्त होणे म्हणजे जीवनमुक्ती होय.

विशेष म्हणजे मुक्ती व जीवनमुक्ती या स्थितींचा अनुभव आपण संगमयुगातच करू शकतो. कारण परमधाममध्ये आत्मा जेव्हा मुक्तीमध्ये असतो तेव्हा तेथे कुठलाही अनुभव होत नाही. तसेच स्वर्गात आत्मा जेव्हा जीवनमुक्त स्थितीत असतो तेव्हा त्याला जीवनबंध म्हणजे काय, याचे ज्ञान नसते.

संगमयुगात आपण जेव्हा स्नेहसागर शिवबाबांच्या स्नेहात लीन होतो तेव्हा आपणही मास्टर स्नेहाचे सागर बनतो. त्यामुळे आपल्या संबंध-संपर्कात येणाऱ्या प्रत्येकाला असे वाटले पाहिजे की आपण स्नेहाच्या प्राप्तीच्या ठिकाणी आलो आहोत. प्रत्येकाला आत्मिक स्नेहाची अनुभूती झाली पाहिजे. **आता आपण हे जाणतो की विश्वातील सर्व आत्मे आपले भाऊ-भाऊ आहोत. त्यामुळे विश्वबंधुत्त्वाचा भाव आपल्या हृदयात भरून उरला पाहिजे. याचेच प्रतीक म्हणून**

**दिपावलीच्या महान पर्वाची सांगता ही भाऊबीजेने केली जाते.**

त्यामुळे बंधुनो, दिपावलीचे पर्व दरवर्षीप्रमाणे केवळ ५ दिवस साजरे करू नका तर दिपावली या शब्दात जे आध्यात्मिक ज्ञान दडलेले आहे ते धारण करा व आपल्या जीवनात सदैव आनंदोत्सव साजरा करा. त्यासाठी सदा दिव्य संकल्प करा, दिव्य बोल बोला, दिव्य कर्म करा व आपले जीवन दिव्यता संपन्न बनवा हीच दीपावली निमित्त मंगलकामना! शेवटी सारांशाने हेच म्हणेन -

**विझणाऱ्या पणत्यांनी करिशी, दीपोत्सव साजरा।**

**आज चेतनी आत्मा दीपक, कधीच न विझणारा।**

**जीवन दिव्य बनवी सत्वरी, दिवाळी करावी अशी साजरी।।**

***

---

**(पान क्र. ३ वरून)**
विरजण पडतं. आज मानवाची भ्रष्ट झालेली नीतीमत्ता, आपसातील कलह, निसर्गाचा बिघडलेला समतोल.जगावर असणारी अणुयुद्धाची टांगती तलवार कलियुगाच्या महापरिवर्तनाची सूचना देत आहेत.

अशा वेळी आत्मा, परमात्मा तसेच सृष्टिचक्राचं ज्ञान प्राप्त होणं अतिशय आवश्यक आहे. शिव परमात्मा 'साकार माध्यम' प्रजापिता ब्रह्माबाबांच्या मुखाद्वारे सत्य ज्ञान देत आहेत. कलियुग व सत्ययुगाचे 'पुरूषोत्तम संगमयुग' चालू आहे. कल्पापूर्वीचं स्मरण करून देताना परमशिक्षक शिवबाबा सांगतात की ५००० वर्षांपूर्वी सत्ययुगात एकमेव भारतखंड होता. जिथे संपूर्ण पवित्रता, सुख, शांती होती. त्या सत्ययुगात तुम्हीच चैतन्य देवी देवता होतात. आता सृष्टिनाटकात पुन्हा ते युग येणार आहे. **म्हणून या संगमयुगात स्वतःला चैतन्य शक्ती आत्मा समजून, परमात्मा शिवबाबांच्या पवित्र स्मृतीत राहणे हा पावन बनण्याचा एकमेव उपाय आहे.**

**'मी आत्मा ज्ञान-योगाच्या अभ्यासाने व दिव्य गुणांच्या धारणेने सर्वगुणसंपन्न देवता बनणार आहे. जन्मजन्मांतरासाठी श्रेष्ठ राज्यपदाची प्राप्ती मला होणार आहे.' अशाप्रकारे आपण जितकी सत्य ज्ञानाची व श्रेष्ठ भविष्याची स्मृती ठेऊ तितकी एकरस आनंदाची अनुभूती होत राहील.**

(संदर्भ पुस्तक : ज्ञानमाला भाग १)

**भावानुवाद : ब्र.कु.मिनल, ठाणे 'पश्चिम'**

***

---

# निद्राजीत बनण्यासाठी


**राजयोगी जीवनात सर्वात मोठे विघ्न 'निद्रा' हेच आहे. निद्राजीत बनल्याशिवाय हे जीवन सार्थक होणार नाही. म्हणूनच निद्राजीत बनण्यासाठी आपल्याला विशेष प्रयत्न केले पाहिजेत.** त्यासाठी प्रत्येकाला हे चेक केले पाहिजे की कुठल्या कारणामुळे आपण निद्राजीत बनू शकत नाही. याची बरीच कारणे असू शकतात. तसेच त्यांचे समाधान देखील निश्चितच असणार. त्यामुळे सर्वप्रथम आपल्याबाबतीत निद्राजीत न बनण्याची नेमकी कारणे कुठली, हे शोधून काढा व ती दूर करण्यासाठी योग्य ती उपाययोजना अंमलात आणा.

अमृतवेळेला, जेव्हा विश्वातील प्राणीमात्र झोपी गेलेले असतात. अशावेळी तपस्वी ब्राह्मण आत्मे जागे होऊन, शिवबाबांच्या प्रेमपूर्वक आठवणीने, आपली बुद्धी अनेक प्राप्तींनी भरपूर करून, जन्मजन्मांतरासाठी आपले जीवन सफल करू शकतात.

अमृतवेळेला झोप येण्याची संभाव्य कारणे पुढीलप्रमाणे आहेत - १) शारीरिक थकावट २) बहिर्मुखता ३) व्यर्थ संकल्प ४) पापकर्माचे ओझे ५) शरीराची दुर्बलता वा आजार. त्याचबरोबर निद्राजीत बनण्यासाठी पुढील उपाययोजना करावी - १) ब्राह्मण जीवनाच्या श्रेष्ठ स्मृतींना इमर्ज करा. २) अंतर्मुखतेचा अभ्यास करा. ३) कुठल्या ना कुठल्या रचनात्मक कार्यात मनाला गुंतवा. ४) आध्यात्मिक ज्ञानाचे मनन-चिंतन करा. ५) अमृतवेळा ही परमात्म मीलनाची सर्वश्रेष्ठ वेला आहे; याचे स्मरण ठेवा.

**- आदरणीय दादी रतन मोहिनीजी**

***



# निश्चयबुध्दि विजयन्ति ... संशयबुध्दि विनश्यन्ति !

ब्र.कु. हेमंतभाई, शांतिवन, आबूरोड

शांतिदूत बनून श्रीकृष्णाने 'इंद्रप्रस्थ पांडवांना परत करा किंवा पाच गावं तरी द्या' हा प्रस्ताव कौरवांपुढे मांडला. तेव्हा 'पाच गावं तर सोडा, मी पांडवाना सुईच्या टोकाएवढी भूमी ही देणार नाही.' दुष्ट दुर्योधनाच्या ह्या दुराग्रही हट्टामुळे शांतिवार्ता विफल झाली, युध्द अटळ झाले. कौरव पांडव सेना युध्दासाठी सज्ज झाल्या. युधिष्ठिराने पितामह भिष्मांकडे जाऊन त्यांना नमस्कार केला. तेव्हा त्यांनी 'विजयी भव' हे वरदान दिले. हे पाहून दुर्योधन भिष्मांना म्हणाला, 'तुम्ही युध्द तर करताय माझ्याकडून, मात्र विजयाचे वरदान पांडवाना का देताय?', तेव्हा भीष्म उत्तरले, 'अरे मूर्खा, तू ही युधिष्ठरला नमस्कार केला असता, तर जेष्ठ असल्याने त्याने तुला ही विजयाचेच वरदान दिले असते', परंतु संशयग्रस्त दुर्बुध्दीमुळे दुर्योधनाने त्याचे ऐकले नाही. युधिष्ठिराने विनम्रतेने शत्रुपक्षास नमवले व युध्द सुरु व्हायच्या आधीच विजय निश्चित केला. हे सर्वविदित आहे की पांडवांनी महाभारताचे महायुध्द जिंकले व कौरव हारले, कारण पांडव दृढनिश्चयी, प्रीतबुध्दी होते तर कौरव संशयी, विपरीत बुद्धी होते. म्हटले ही जाते, 'दृढनिश्चयात्मक प्रीतबुध्दि विजयन्ति व विनाशकाले विपरित बुध्दि विनश्यंति'

तसं ही युध्दासाठी निघालेल्या महावीराची आरती करुन, मस्तकी विजयाचा तिलक देतात. मातपिता व गुरुजन विजयश्रीचे वरदान ही देतात. कारण वरदानातच विजयाचे सामर्थ्य, शक्ती व गुप्त रहस्य सामावलेले असते. योद्ध्याचे एकमेव लक्ष्य असते 'विजय.' पराक्रमी योध्दयासाठी महाभारताचे रणांगण असो की खेळाडूसाठी खेळाचे क्रिडांगण, विद्यार्थ्यांसाठी विद्येचे प्रांगण असो की साधक तपस्वीसाठी आश्रमाचे अंगण, कोणत्याही कार्यक्षेत्रात संघर्ष करणारा, मग तो योध्दा, खेळाडू, विद्यार्थी किंवा साधक असो, प्रत्येक पुरुषार्थी विजयाचीच कामना करतो. मग ते कुरुक्षेत्रातले भीषण युध्द असो किंवा रात्रंदिवस अंतर्मनात चालत असलेले अंतरद्वंद्व. संत तुकाराम ही म्हणत, 'रात्रंदिन आम्हा युध्दाचा प्रसंग.' व्यवसायाने वाणी असूनही त्यांनी असं कोणतं युध्द केलं? मानवी मनात सत्य-असत्यामधे होणाऱ्या युध्दाविषयी ते हे वदले होते.

**जेव्हा खरे-खोटे, धर्म-अधर्म व पाप-पुण्याच्या पेचात बुध्दी फसते, तेव्हा मनात सदगुणरुपी पांडव व अवगुणरुपी कौरवांमध्ये भयानक युध्द होऊ लागते आणि मग अंतरमनात व बाह्यजगात महाभारतासारख्या स्थिती-परिस्थिती भासू लागतात. परंतु निश्चयाचा महामेरु बनल्याशिवाय विजश्रीचे वरण कसे करता येईल?** कारण विजयाचा आधार आहे निश्चय आणि निश्चयाचे चार मजबूत स्तंभ आहेत आत्मा, परमात्मा, दैवी परिवार व सृष्टी नाटक म्हणजे नियती ह्या चार गोष्टींवर निश्चय. ज्याप्रमाणे चारचाकी गाडीच्या एकाही चाकाच्या टायरची हवा निघाली तर गाडी लक्ष्यापर्यंत पोहचू शकत नाही! असंच आत्म्याचे गुण, परमात्म्याची शक्ती, दैवी परिवाराचा सहयोग व सृष्टी नाटकाच्या कर्माच्या गुह्य गतीचे नियम ह्या चार बिंदूंपैकी एकाही घटकाच्या निश्चयात कमी आली तर विजयाची कामना करणेच निष्फळ ठरते. कारण विजयरथाची हीच चार चाकं विजयश्रीच्या लक्ष्यापर्यंत पोहचवू शकतात.

मानव मन नेहमीच यशाच्या

पाठीमागे धावत असते. पण कधी कधी अपयशाच्या भीतीने माणूस गांगरतो, तेव्हा मनात शंका कुशांकानी काहुर माजते व माणूस उगीचच मनोमन चिंता करत बसतो 'माहित नाही, केलेल्या कामाचे चीज होईल की नाही? प्रयत्नांना यश येणार की नाही? पुरुषार्थाचे फळ मिळणार की नाही?' अशा निरर्थक चिंतेने स्वतःवरचा विश्वास गमावून बसतो. कर्म यथार्थ असूनही मन साशंकित होते. मन जिथे संशय व्याप्त असेल तिथे कार्याची सांगता सफलतापूर्ण कशी बरं होणार? अर्थात कार्याच्या पूर्णाहुतीसाठी सर्वात आधी विश्वास पाहिजे स्व-कर्मावर, सर्व प्रथम निश्चय हवा स्व-कर्तृत्वावर! कारण पुरुषार्थावर दृढ निश्चय असेल तरच हिमालयाचे गौरीशिखर ही गाठले जाऊ शकते. स्वतःच्या कार्यावर ठाम विश्वास असला तर लोकांच्या नजरेत दुष्कर वाटणारे कार्य ही सहज होते. हेच सांगणारा एका निष्पाप बालकाचा हा बोलका प्रसंग पुढीलप्रमाणे -

एका राज्यात भयानक दुष्काळ पडला. नगरवासी इंद्राच्या प्रसन्नतेसाठी यज्ञ करायला निघाले. एक बालक त्यांना म्हणाला, 'तुम्ही कुठे जातायं?' लोक म्हणाले, 'आम्ही यज्ञ करायला निघालो.' बालक म्हणाला, ' त्याने काय होईल?' लोक उत्तरले, ' त्याने इंद्र प्रसन्न होऊन पाऊस पाडेल,' मग तो बालक छत्री घेऊन सर्वांसोबत निघाला. लोकांनी त्यास विचारले, ' आकाश निरभ्र असूनही छत्री का घेतली?' तेव्हा निश्चयपुर्वक तो म्हणाला, ' यज्ञाने प्रसन्न होऊन इंद्र पाऊस नाही का पाडणार?' त्याचा उत्तरावर सर्व हसू लागले. यज्ञ करुन सर्व परतले व मुलाच्या हातात छत्री पाहून त्याची थट्टा केली. कारण पावसाचे कुठेही चिन्ह नव्हते. परंतु अचानक आभाळ ढगांनी भरले व मुसळधार पाऊस पडू लागला. बालकाच्या निर्मळ निश्चयावर प्रसन्न होऊन इंद्राने वर्षा केली. बालक विजयी योद्ध्यासम रुबाबाने छत्री घेऊन चालत होता, मात्र लोकांचा भिजलेला व लाजलेला चेहरा पाहण्यासारखा होता.

**लक्ष्य प्राप्तीसाठी जेवढा आत्म विश्वास प्रबल हवा, तेवढाच सर्वशक्तिवान ईश्वराच्या अगाध सामर्थ्यावर ही प्रचंड निश्चय हवा. कारण जेव्हा स्व-शक्ती अपुरी पडते तेव्हा परमात्म शक्तीच कामी येते.** विराटदर्शन झाल्यावर, 'माझा साथी-सारथी साधारण नसून सर्व समर्थ आहे' हा दृढ निश्चय झाल्यानेच अर्जुन युध्द जिंकू शकला. योग्य मार्गदर्शनाशिवाय महावीराची शक्ती ही निकामी ठरते. प्रयत्नास योग्य दिशा देऊन विजयाची वाट दाखविणारा वाटाड्या पथ प्रदर्शक ठरतो, **असेच ईश्वरीय महावाक्यां (ज्ञानमुरली) द्वारे मिळणारे श्रीमत उन्नती व उत्कर्ष करणारा सर्वश्रेष्ठ मार्गदर्शक वाटाड्या ठरते. उत्तम फलदाई कर्मासाठी शिवपिता जे श्रेष्ठ मत (श्रीमत) देतात, ते सर्वथा कल्याणकारी आहे-ह्यावर शंभर टक्के निश्चय असल्यावरच विकार व विपत्तींवर विजय मिळू शकतो.** कारण संकट समयी पुकारल्यावर परमात्मा श्रेष्ठ मत देऊन समस्यांच्या समाधानाचे सूत्र सुचवतो. ईश्वरावर निश्चय म्हणजे त्याच्या ज्ञानावर-वाणीवर निश्चय नसेल तर, श्रीमताद्वारे सांगितलेला उपाय न ऐकल्याने, पदरी अपयश येते. हेच मर्म सांगणारा एक प्रसंग पुढे नमूद केला आहे.

एकदा एक गिर्यारोहक मुलगा पर्वतावर चढत होता. तेवढ्यात अंधार होऊ लागला आणि अचानक त्याचा पाय घसरला व तो तीव्र वेगाने खोल दरीत मृत्यूच्या मुखाकडे जाऊ लागला. अचानक त्याचा हात एक वृक्षाच्या फांदीला लागला. त्याने फांदी घट्ट पकडून ठेवली व जीवन मृत्यूच्या संघर्षात देवाला विनवू लागला, 'हे परमेश्वरा मला वाचव', तेव्हा आकाशवाणी झाली, 'हे वत्स, पकडलेली फांदी सोडून दे.' ईश्वरीय वाणी ऐकूनही त्यावर तो विश्वास करु शकला नाही. त्याने रात्रभर झाडाची फांदी तशीच पकडून ठेवली. परंतु काय आश्चर्य ! सूर्योदय झाल्यावर लोकांनी जमिनीपासून फक्त एक फूटावर फांदीला पकडलेल्या त्या मुलाचे झाडावर लोंबकळलेले प्रेत पाहिले. क्षणभर आकाशवाणीवर विश्वास ठेऊन जर त्याने परमात्म संदेश ऐकला असता व फांदी सोडली असती तर त्याला

जीवनदान मिळाले असते. कारण तो जमिनीपासून फक्त फूटभर दूर होता. वेळोवेळी परमात्मा संकटग्रस्तास नाना माध्यमांद्वारे सुटकेचा मार्ग दाखवतो, परंतु त्यावर विश्वास नसल्याने लाभ होत नाही.

**आत्मा-परमात्म्याच्या निश्चयांसोबत तिसरा निश्चय हवा दैवी परिवारावर! जिथे स्वतःचे बळ कमी पडते तिथे दैवी परिवाराची सहयोग शक्ती कामी येते. एकट्याने युध्द जिंकणे अशक्य, पण संघटीत शक्तीने जिंकता येते.** शंभर कौरवांवर पांच पांडवांची एकता भारी पडली. म्हटले ही जाते,'एकीचे बळ देते फळ.' घरात मुलाला शिकवणे अवघड! पण शाळेतील पूरक वातावरण तसेच विद्यार्थ्यांच्या संगाच्या रंगात मुल सहज शिकते. भट्टीतच वीट पक्की होते. एकट्याने योगाभ्यास करणे कठीण, पण योगभट्टीत (सामुहिक योगाभ्यासाच्या नियोजित कार्यक्रमात) सर्वासोबत साधना सहज होते. सहयोगाच्या बोटाने गोवर्धन पर्वत उचलता येतो. संघटीत रुपाने केलेल्या कार्यात कमी शक्ती खर्च करुनही उत्तम परिणाम मिळतात. कुटुंबाची किंवा सामुहिक संघटन शक्ती चमत्कार करते! वीरकुळात जन्मलेल्या व्यक्तीच्या संस्कारात जन्मजात साहस व रक्तात वीरता असते. गरज असते त्यास जागे करायची! पूर्वजांच्या शौर्य गाथा ऐकल्याने मनात स्वमान-स्वाभिमान जागा होतो व शक्तीचा संचार होतो. हारलेली बाजी ही जिकंता येते. अशीच एक घटना आहे.

एका राजाने 'राज्यात कोण पहेलवान आहे?' हे जाणण्यासाठी स्पर्धा आयोजित केली. स्पर्धेची अट होती की जो हातोड्याचा एका घावात दगडाचे दोन तुकडे करेल तोच पहेलवान ठरेल. स्पर्धेत अनेकांनी दगड फोडायचा प्रयत्न केला, पण कुणीच यशस्वी झाले नाही. तेव्हा राजाला एक युवक म्हणाला, 'मला ही संधी द्या' त्याच्या दुर्बल देहाकडे बघून राजा म्हणाला, 'तू काय तोडणार हा दगड?' तेव्हा तो म्हणाला, 'तुमच्या अटी प्रमाणे माझी ही अट आहे की माझ्यासोबत एक व्यक्ती राहिल,' राजाने अट कबूल केली. युवकाच्या कानात सोबती काहीतरी पुटपुटला व त्याने हातोड्याच्या एका घावात दगडाचे दोन तुकडे केले. राजाने त्याचे कौतुक करुन, दगड फोडायचे रहस्य विचारले. तेव्हा तो उत्तरला, 'माझ्या भाट सोबतीने माझ्या पूर्वजांची शौर्य गाथा ऐकवून, मनातली सुप्त शक्ती जागृत केली. मनाच्या शक्तीने तनात ही अमाप शक्तीचा संचार झाला व मी एका घावात दगड फोडू शकलो.'

**चौथा शेवटचा निश्चय हवा विश्व नाटक म्हणजे नियतीवर. कलियुगी जीवनरुपी नाण्याची एक बाजू असते, तीन चतुर्थांश सुख व दुसरी बाजू असते एक चतुर्थांश दुःख. हेच विधीचे विधान होय.** सुख-दुःख, निंदा-स्तुती, हानी-लाभ, जय-पराजय हे दोन्ही पक्ष जरी विरोधी वाटले तरी ते कर्मगतीच्या नियमाचे पूरक घटक आहेत. कारण दुःखाविना सदैव लाभणारे सुख व निंदेविना सतत होणारी स्तुती पतनाकडे नेते. नुकसानाविना होणाऱ्या नफ्याची व पराजयाविना सहजतेने झालेल्या विजयाची किंमत नसते! भुकेविना भोजनाचा स्वाद व जागरणाशिवाय गाढ झोप येत नाही. अमावस्येमुळेच पौर्णिमेला महत्व असते! 'निसर्ग-नियमाप्रमाणे एकामागोमाग येणाऱ्या व जाणाऱ्या ऋतुंसारखे सुखानंतर दुःख व पुन्हा सुख आणि विजयानंतर पराजय व पुन्हा विजय होतो. नियतीच्या ह्या नियमावर अटळ विश्वास असला तर दृष्टिकोन सकारात्मक होतो व अपयशात नैराश्य येत नाही. त्यामुळे विरोधी विषम परिस्थितींना ही तोंड देता येते. **आयुष्यात घडणाऱ्या प्रत्येक घटनेत कोणते ना कोणते यशाचे गुप्त रहस्य दडलेले असते**-हेच सांगणारा एक बोधप्रद प्रसंग पुढीलप्रमाणे -

एकदा कोळी समुद्रात मासेमारीसाठी निघाले. अचानक समुद्रात वादळ उठले. कोळी सुखरुप परत यावेत म्हणून नातेवाईक समुद्राकाठी ईश्वराची प्रार्थना करु लागले. रात्र ही झाली. अचानक एका झोपडीला आग लागली. झोपडीची मालकिण तेथे धावतपळत पोहचली, पण मदत न मिळाल्याने झोपडी जळून राख झाली. पहाट होताच

नावा ही दिसू लागल्या. काठावर कोळी येताच नातेवाईक प्रेमाने मिठ्या मारत त्यांना भेटू लागले, जळालेल्या झोपडीची मालकीण ही पतीला भेटली. तिच्या डोळ्यात पाणी पाहून त्याने विचारले,'प्रिये, मला पाहून तू खुश का नाहीस?' तेव्हा ती म्हणाली,'तुम्ही आल्याचा आंनद कसा वर्णू? पण दुर्देवं! तुमचं स्वागत कुठे करु? एकमात्र झोपडी होती, ती ही आगीत जळाली.' तेव्हा पती हसत म्हणाला,'प्रिये, देवाचे खूप-खूप आभार! जर झोपडी जळाली नसती तर किनारा दिसला नसता. कारण झोपडीच्या ज्वालांनीच किनारा दाखवला. देवाची कृपा झाली तर झोपडी ऐवजी महाल ही मिळेल. **तात्पर्य म्हणजे आयुष्यात घडणाऱ्या प्रत्येक गोष्टीत कोणते ना कोणते यशाचे गुप्त रहस्य दडलेले असते. त्यामुळे जीवनात कधीही निराश होऊ नका. सदैव पुढीलप्रमाणे सकारात्मक चिंतन करा म्हणजे निश्चितच विजय प्राप्त होईल.**

१) मी सर्वगुण संपन्न, समर्थ आत्मा आहे, सफलतेच्या सर्व क्षमता माझ्यामध्ये आहेत व सफलता माझा ईश्वरीय जन्मसिध्द अधिकार आहे, २) मी सर्वशक्तिवान शिव परमात्म्याची संतान आहे, तो मला कोणत्याही परिस्थितीत व परीक्षेत एकाकी पडू देणार नाही, परमेश्वर माझा सोबती-सांगाती, साथी-सारथी आहे, (अर्थात 'ईश्वर अपने साथ है तो डरने की क्या बात है!) ३) संगमयुगात अलौकिक ब्राह्मण कुळात माझा मरजीवा अलौकिक जन्म झाला आहे. त्यामुळे सत्ययुगात सूर्यवंशी कुळ व त्रेतायुगात चंद्रवशी कुळ लाभणार आहे, माझे ब्राह्मण, देवता व क्षत्रिय ही तिन्ही कुळं श्रेष्ठ आहेत, मीच पूर्वज व पुज्य आत्मा आहे. ४) मी सृष्टी नाटकात उत्तम भूमिका बजाविणारा हिरो पार्टधारी, महान कलाकार आहे. मी कल्प कल्प महानायकाचे पात्र यशस्वीपणे प्रस्तुत केलेले आहे. खरे तर हिरो कधीही हारत नाही. म्हणून माझा कधीही पराभव वा पराजय होऊच शकत नाही कारण मी प्रत्येक कल्पात विजयी होणारा आत्मा आहे. **अशा प्रकारे निश्चय बुद्धी होऊन केलेले चिंतन, अंतरंगी होणाऱ्या युद्धात, विकारी विकृतींशी झुंज देण्यास समर्थ बनविते. खरे तर असा दृढनिश्चयात्मक प्रीत-बुद्धी आत्माच विजयाचा अधिकारी बनतो, म्हणूनच म्हटले जाते 'निश्चयबुद्धि विजयन्ति...'**

***

## पाच स्वरुपांचे चिंतन

**चक्र स्वदर्शन फिरवू या ।**
**पाच स्वरुपांना गुंफू या ।।धृ।।**
**शिवपिता भूवर अवतरती ।**
**ब्रह्मा तनाचा आधार घेती ।**
**ज्ञान त्यांच्या मुखातून घेऊन,**
**ब्राह्मण कुलभूषण होऊ या ।।१।।**

**देह-दैहिक बंधन विसरुन ।**
**शिवबाबांच्या स्मृतीत राहून ।**
**मुक्त फरिश्ता होऊन आपण ।**
**उडती कला अनुभवू या ।।२।।**
**योगबळाने पावन होऊन ।**
**घरी शांतीधाममध्ये जाऊन ।**
**अनादि आत्मिक पवित्र स्थिती ।**
**आपण सारे अनुभवू या ।।३।।**

**प्रेम प्रकाशित आत्मा होऊन ।**
**सूर्यवंशी कुळात जन्मा येऊन ।**
**देवपदाचे शिखर गाठून ।**
**जन्म सार्थकी लावू या ।।४।।**

**भक्तिमार्गात जड मूर्तीतून ।**
**शुभभावना, भक्ता चिंतून ।**
**मंदिरातूनी वंदनीय त्या ।**
**पूज्य देवता होऊ या ।।५।।**

**काळानुसार येई कलाहीनता ।**
**होणे पुजारी नशिबी येता ।**
**पावन बनूनी होण्या देवता ।**
**पाच स्वरुपांचे चिंतन करुया।।६।।**

**ब्र. कु. वसंत निंबाळकर,**
कागल (कोल्हापूर)



# कर्मयोगी जीवन

ब्र. कु. डॉ. सचिन भाईजी–(ग्लोबल हॉस्पिटल) मा. आबू

एक तपस्वी, कोणत्यातरी डोंगरावरील जंगलात तपस्या करत असतो. वर्षानुवर्षे त्यांची तपस्या चालू असते. एक दिवस एका झाडाखाली तपस्या करण्यासाठी बसला असताना त्यांच्या डोक्यावर झाडाची वाळलेली पाने व सुकलेल्या बारीक फांद्या पडतात. तसा तो वरती पहातो, तर त्यास आढळते की एक कावळा आणि दूसरा पक्षी सारस (क्रेन) आपसात भांडत असतात, व त्यामुळे तो सुकलेला पालापाचोळा त्याच्या अंगावर पडत असतो. या गोष्टीचा त्या तपस्वीला भयंकर क्रोध येतो. व त्या भयंकर क्रोधाने थरथरत तो पक्ष्यांकडे पहातो, त्याच्या भृकुटीमधून आगीचा गोळा निघतो आणि त्यात ते दोन्ही पक्षी जळून भस्म होतात. जेव्हा त्या पक्षांचे भस्म होताना तो तपस्वी पाहतो त्याचा आनंद द्विगुणीत होते. त्याला प्रथमच या गोष्टीची जाणीव होते की आपल्यामध्ये खूप शक्ती आली आहे. आपल्याला सिद्धी प्राप्त झाली आहे.

त्या दिवशीच जेवणाच्या वेळेस तो डोंगर उतरुन गावात भिक्षा मागण्यास जातो. फिरता फिरता तो एका घराजवळ येतो व दारात उभे राहून बोलतो ‘भिक्षाम् देही’. तर आतून एका मातेचा आवाज येतो. ती त्यास सांगते की ‘महाराज आपण थोडावेळ थांबावे मी व्यस्त आहे.’ तो तपस्वी आश्चर्यचकीत होऊन विचार करतो की ही माता मला थांबण्यास सांगत आहे? तिला माहीत नाही का मी कोण आहे ते? किती शक्तिशाली महान तपस्वी आहे मी! जेव्हा तो असा विचार करत असताना पुन्हा आतून त्या मातेचा आवाज येतो की ‘महाराज मी माझ्या पतीची सेवा करत आहे, तर आपण थोडावेळ थांबावे, मी म्हणजे ते जंगलातील पक्षी नाही की तुम्ही मला भस्म कराल.’ त्या तपस्वीला खूप आश्चर्य वाटते की या मातेला हे कसे कळले? ही गोष्ट तर एकदम एकांतात झाली होती. मी पक्ष्यांना भस्म केले तेव्हा तेथे कोणीच नव्हते, मग या मातेला कसे कळले? थोड्यावेळाने ती माता तपस्वीसाठी भिक्षा घेऊन येते व त्यास देऊ करते. तो तपस्वी तिच्या पाया पडतो व विचारतो, ‘हे माते, तुला कसे कळले की मी माझ्या शक्तीने त्या पक्ष्यांना भस्म केले ते?’ ती माता म्हणते की ही शक्ती मला सेवेने प्राप्त झाली आहे. मला तपस्या माहीत नाही आणि मी कधी केली नाही. मी तुमच्यासारखी संन्यासी पण नाही. मी माझ्या पतीची सेवा करत आहे. **पतीसेवे अगोदर मी आपल्या पित्याची सेवा करत होते आणि अशी सेवा करतानाच मला ही शक्ती प्राप्त झाली आहे की दुसऱ्याच्या मनातील विचार मी ओळखू शकते. ही सिद्धी मला माझ्या कर्माने मिळाली आहे.**

ती माता त्या तपस्वीला सांगते की तुम्हाला जर या विषयाबद्दल जास्त जाणून घ्यायचे असेल तर तुम्ही असेच थोडे पुढे जा. तेथे तुम्हास एक व्याध (शिकारी) भेटेल. त्याच्याकडूनच तुम्हाला या शक्तींचे ज्ञान प्राप्त होईल.

तो संन्यासी तेथून निघतो व विचार करत चालत असतो की मला एका एवढ्या उच्च तपस्व्याला एक शुल्लक व्याध शिकवणार? जो हिंसक आहे, शिकार करतो, प्राण्यांना मारतो तो काय मला शिकवणार? तरी सुद्धा तो तपस्वी त्या व्याध्याकडे जाऊन पोहचतो. बघतो तर काय, त्याला धक्काच बसतो. तो

जो शिकारी तिचे मांस कापत बसलेला असतो. तो संन्यासी विचार करतो इतका पापी मला काय सांगणार? आणि त्या मातेने मला याच्याकडे पाठवले शिकण्यासाठी? तरीही संन्यासी त्या व्याधसमोर जाऊन उभा राहतो. व्याध त्यास सांगतो की महाराज तुम्हाला थोडावेळ थांबावे लागेल कारण मला माझे हे काम पूर्ण करावयाचे आहे. व्याध आपले काम पूर्ण करून संन्याशास आपल्या घरी घेऊन जातो. तिथे तो तपस्वीस सांगतो की महाराज आपणास पुन्हा थोडा वेळ थांबावे लागले, कारण घरात माझे वृद्ध आई-वडील आहेत व त्यांना आता भोजन करावयाचे आहे. मी त्यांची सेवा करून येतो व नंतर तुम्हास भेटतो. तोपर्यंत तपस्वी व्याधाची वाट पहात बाहेर थांबतो. व्याध घरात जातो आपल्या आई-वडीलांची व्यवस्थित सेवा करून बाहेर येतो व त्या तपस्वी समोर आदर व्यक्त करीत उभा राहतो. विचारता होतो की हे तपस्वी तुम्हास माझ्याकडून काय जाणून घ्यायचे आहे? संन्यासी त्यास सांगतो की मी तुझ्याजवळील ज्ञान ऐकण्यास आलो आहे. मग थोड्याच वेळात तो व्याध त्याला असे काही ज्ञान सांगतो की त्या ज्ञानाचे वर्णन शास्त्र-उपनिषद मध्ये केले आहे. महाभारतात त्यास व्याध-गिता म्हटले जाते. त्या व्याधाने त्या संन्याशास सांगितलेले ज्ञान म्हणजे 'कर्मयोगाचे ज्ञान'.

वरील कथेत वर्णित ती एक माता होती, जिने दैनंदिन कार्य करताना, आसक्तीरहीत व निस्वार्थ भावनेने कर्म करीत त्या सिद्धी प्राप्त केल्या ज्या एका साधकाने संन्यासी बनून, अनेक वर्षे तपस्या करून प्राप्त केल्या होत्या आणि दूसरा व्याध. संन्यासी त्यास विचारता झाला की आपणास एवढे ज्ञान असून सुद्धा हे प्राण्यांना मारण्याचे नीच कृत्य तुम्ही का करता? तेव्हा व्याध सांगतो, हे कर्म आमच्या पिढीत परंपरेने चालत आले आहे. पण मी हे कर्म संपूर्ण अनासक्त वृत्तीने करतो. मला या कर्माच्या बाबतीत कुठलीही आसक्ती (Attachment) नाही. हे कर्म मी मोठ्या प्रेमाने आणि निस्वार्थ भाव ठेवून करतो. तो पुढे म्हणतो जर मी नाही प्राण्यांना मारले तर दुसरे कोणीतरी मारेलच आणि आमच्या घराण्यात हे पूर्वपार चालत आलेले कर्म आहे. मला माहीत आहे की प्राण्यांना मारणे ठीक नाही पण याबाबतीत मी पूर्णपणे अनासक्त आहे.

**भक्तिमार्गातील शास्त्र व कथा या द्वापारयुगात लिहिल्या गेल्या आणि तेव्हापासून अनासक्त, निस्वार्थ कर्माची चर्चा बरीच झाली. महाराष्ट्रातील पंढरपूर क्षेत्राची कथासुद्धा आपण सर्व जाणतो. भक्त पुंडलिकाने आपल्या माता-पित्यांची मनोभावे सेवा केली. म्हणून त्याच्या भेटीसाठी साक्षात श्री विठ्ठल प्रकट झाले. ही आहे माता-पित्यांच्या सेवेची महती! 'पुंडलिकाचे भेटी परब्रह्म आले गा, अशी त्याची महिमा आहे.'**

**आता ईश्वरीय ज्ञानानुसार आपण पाहूया की कर्मयोगी जीवन कसे असते** - एक आहे कर्मसंन्यास आणि एक आहे कर्मयोग. एक आहे कर्मालाच सोडून देणे, संन्यास घेऊन संन्यासी बनणे. सांसारिक सर्व कर्म बंद. परंतु वास्तविक कर्म संन्यास होऊ शकत नाही. साधा विचार करणे पण कर्मच आहे. बोलणे पण कर्मच आहे. या दुनियेमध्ये सर्वश्रेष्ठ योगी तो आहे जो सर्व कर्म करून सुद्धा योगी आहे. काही योगी असे आहेत ज्यांनी घरदार सोडले, संसाराचा त्याग करून, जंगलात जाऊन, संन्यासी बनून, तपश्चर्या करू लागले. हे तर सर्व सहज आहे. परंतु जर कर्मातीत बनायचे असेल तर त्याची पहिली पायरी आहे कर्मयोगी बनणे.

कर्मयोगी बनल्याशिवाय कर्मातीत बनणे केवळ अशक्यच. कर्माच्या प्रभावापासून उपराम व्हायचे असेल तर कर्मयोगी बना. कोणाला वाटेल मला कर्मातीत बनायचे आहे. त्यासाठी मी सर्व कर्म सोडून तपस्या करेन परंतु त्याने कर्मातीत बनू शकणार नाही. **सर्व दैनंदिन कर्म करताना, सर्व जबाबदारी सांभाळून, कर्मयोगी जीवन बनविणे हाच खरा योग आहे. कर्मयोग हीच सर्वोच्च अवस्था आहे. हठयोगी कर्मयोगी होऊ शकत नाही.** हठयोगी शरीराला त्रास देतात. कर्मसंन्यास करणारे कर्मयोगी बनू शकत नाही. एक

योगी होता तो सुद्धा जंगलामध्ये रहात होता. जवळ जवळ १०-१२ वर्षे त्याने तपश्चर्या केली. त्याला वाटले आपण क्रोध मुक्त झालो. जंगलात एकांतात तपस्या चालू होती, तेथे तर क्रोध येण्याचे काहीच कारण नव्हते. त्यामुळे १०-१२ वर्षे तपस्या झाल्यावर त्या योगीला वाटले की त्याने सर्व विकारांवर विजय मिळविला. एक दिवस तो योगी फिरत-फिरत जंगलाजवळच्या एका गावात येतो. तेथे तो भिक्षा मागण्यास सुरुवात करतो. एका घराबाहेर पाळण्यात एक छोटे बाळ जोरात रडत असते. योगीने त्या रडणाऱ्या बाळास गप्प होण्यास सांगितले. आता ते इतकं छोट बाळ अस सांगून थोडेच गप्प होणार? बाळ रडतच राहिले. इकडे त्या १०-१२ वर्षे तपस्या केलेल्या योगीला राग येऊ लागला. भुकेलेले ते बाळ अजून जोरात रडू लागले. तसा तो योगी त्यास जोरात ओरडू लागला. अचानक त्याला वाटले की अरे! असे कसे झाले? मला तर वाटले की मी संपूर्ण क्रोधमुक्त झालो आणि इथे तर इतक्या छोट्या बाळामुळे मला राग आला. तात्पर्य म्हणजे तो योगी क्रोधापासून मुक्त झालाच नव्हता. त्याच्या क्रोधाचे केवळ दमन झाले होते. कोणी एकांतात असेल तर राग कसा येईल? क्रोधमुक्त अवस्था म्हणजे सर्वांबरोबर असताना, सर्व संबध-संपर्कमध्ये असताना क्रोधापासून मुक्त असणे. सर्वांबरोबर राहून, कोणत्याही परिस्थितीत असून कर्म करणारा योगी तो खरा कर्मयोगी. **शिवबाबांनी आपणा सर्वांना कर्मयोगी बनण्यास सांगितले आहे. बाबांनी हे नाही सांगितले की एका जागेवर बसून तपस्या करा. आपल्याला कर्मयोगी बनायला सांगितले आहे. त्यासाठी आवश्यक अशा ७ गोष्टी आपण पाहू या.**

**निस्वार्थ कर्म**

जे कर्म निस्वार्थ आहे तेच श्रेष्ठ कर्म आहे. कर्मयोगी जीवन अर्थात निस्वार्थ कर्म. जे ही कर्म आपण करू ते सर्वांच्या कल्याणासाठीच असले पाहिजे. 'बहुजनहिताय... बहुजनसुखाय'. ज्या कर्माने सर्वांचे कल्याण होईल व सर्वांना सुख प्राप्त होईल. असे निस्वार्थ श्रेष्ठ कर्म ज्यात स्वार्थ नसेल. निस्वार्थ कर्म अर्थात ज्यामुळे असंख्य आत्म्यांचे कल्याण होईल. असंख्य आत्म्यांना शिवबाबांचा (परमेश्वराचा) परिचय मिळेल. असंख्य आत्म्यांना परमात्म्याच्या ज्ञानाचे आकलन होऊन, ते जीवनात धारण करतील. अनेक आत्म्यांना परमात्म मीलनाचा आनंद मिळेल. मधुबन पावन भूमीवर येण्याचे भाग्य प्राप्त होईल. अशा प्रकारची शुद्ध भावना आपल्या निस्वार्थ कर्मात असेल आणि अशी शुद्ध निस्वार्थ भावना नेहमीच पूर्ण होते. याउलट ज्या भावनेत स्वार्थ आहे ती पूर्ण होत नाही. जेवढी भावना निस्वार्थ, ते कर्म तेवढे निस्वार्थ तसेच ते अती श्रेष्ठ असते. आपला परीवार, मित्रसंबंधी, शेजारी-पाजारी या सर्वांना ज्ञान मिळावे; बाबांचा परिचय प्राप्त व्हावा ही इच्छा छानच. परंतु ती निस्वार्थ आहे का? जर इच्छा निस्वार्थ असेल तर ती अवश्य पूर्ण होईल. तात्पर्य म्हणजे आपली सेवा देखील निस्वार्थ असली पाहिजे. सर्व सेवा निस्वार्थ भावनेने होत असेल तरच त्यातून आपल्याला बळ मिळते. बऱ्याचदा विचार येतो की या सेवेमुळे माझा काय फायदा होणार आहे? हाच 'माझा-माझा' हा शब्द हटवून सर्वांचा फायदा कसा होईल, असा विचार केल्याने निस्वार्थ सेवा होईल.

निस्वार्थ कर्मामुळे सर्व आत्म्यांच्या शुभभावना, (दुवा) आशिर्वाद प्राप्त होतात. जसे वरील गोष्टीतील माता बाहेर कुठेही सेवा करायला गेली नाही परंतु निस्वार्थ भावनेने आपल्या पित्याची व पतीची सेवा करीत गेली. फलस्वरुप तिला सिद्धी मिळाली होती.

**अनासक्त भाव**

दुसरी गोष्ट (Detachment) अनासक्त भाव. जसा वरील गोष्टी मधला शिकारी, व्याध पाहिले तर त्याचे कर्म अगदीच निकृष्ट परंतु त्यात ही त्याचा अनासक्त भाव. त्याच प्रमाणे आपल्यालासुद्धा कुठलेही कर्म करताना अनासक्त भाव धारण करणे, आता आवश्यक आहे. सेवा केली, सफल झाली तर खूप खूप आनंद आणि खुशी.

**(पान क्र. २७ वर)**



शाहुवाडी (मलकापूर) : डी.एस.पी.श्री. देशमुख व पोलिस स्टाफला राखी बांधतांना ब्र. कु. वंदना व वर्षा बहेन.



बांबवडे (कोल्हापूर) : पोलिस निरीक्षक श्री. चव्हाण यांना पावन राखी बांधतांना ब्र. कु. संगीता बहेन.



संगमनेर : 'सकारात्मक जीवनशैली' या विषयावर मार्गदर्शन करतांना ब्र. कु. डॉ. सचिन परब, मंचासीन ब्र. कु. भारती बहेन, कार्यकारी इंजि. श्री. काकड, डॉ. लबडे मॅडम.




विटा (सांगली) : येथील पोलिस स्टाफला राखी बांधल्यानंतर ग्रुप फोटोत ब्र. कु. नंदा बहेन व डॉ. पवार.



पुणे (सहकारनगर) : येथील पोलिस स्टेशनमधील अधिकारी व कर्मचारी वर्गाला ईश्वरीय संदेश दिल्यानंतर ग्रुप फोटोत ब्र. कु. अरुणा बहेन व पूजा बहेन.



चाकूर (उदगीर) : बी. एस. एफ. कॅम्पमधील मेजर श्री. संजीव अनोट यांना रक्षा सूत्र बांधतांना ब्र. कु. महानंदा दीदीसोबत ब्र. कु. छाया बहेन.



डोंबिवली (मुंबई): 'राजयोग द्वारा तनाव मुक्त जीवन' याविषयी प्रबोधन केल्यानंतर ग्रुप फोटोत ब्र. कु. शकू दीदी व अलायन्स कंपनीचा स्टाफ.




चंद्रपूर : 'तंबाखू नियंत्रण' कार्यक्रमात विद्यार्थ्यांना उद्‌बोधन करतांना ब्र. कु. दिपा बहेन शेजारी ब्र. कु. सूरजभाई व नामपल्लीवार भाई.



गुहागर (रत्नागिरी) : सी. आस. एस. एफ. अंजनवेल मधील जवानांना रक्षाबंधनाचे महत्त्व सांगतांना ब्र. कु. शिल्पा बहेन, मंचासीन श्री. भंडारी.



तळेगाव (दाभाडे) : सी. आर. पी. एफ.चे वरिष्ठ अधिकारी श्री. वीरेंद्रकुमार टोपो यांना राखी बांधतांना ब्र. कु. प्रभा बहेन व मीना बहेन.



जकातवाडी (सातारा) : सहा. अधिक्षक अभियंता श्री. पाटील यांना ईश्वरीय भेट वस्तू देतांना ब्र. कु. कांचन बहेन व शांता बहेन.



पेठ वडगाव : पोलिस अधिकारी व स्टाफला राखी बांधल्यानंतर ग्रुप फोटोत ब्र. कु. योगिनी, गितांजली व विद्या बहेन.



सांगवी (पुणे) : सेवाकेंद्राद्वारे आयोजित वृक्षारोपण कार्यक्रमात सहभागी ब्र. कु. संजीवनी बहेन व ब्राह्मण परिवार.




पुणे (रविवार पेठ) : जिल्हाधिकारी भ्राता नवलकिशोर राम यांना राखी बांधतांना ब्र. कु. रोहिणी व श्यामा बहेन.



भिवंडी : समाजकल्याण ट्रस्टचे अध्यक्ष श्री. पाटील यांना राखी बांधतांना ब्र. कु. बिंदू बहेन.



हिंगणघाट (वर्धा) : मा. नगराध्यक्ष प्रेम बसंतानी यांना राखी बांधतांना ब्र. कु. जयमाला बहेन.



मीरा रोड (मुंबई) : उपमहापौर श्री. चंद्रकांत वैती यांना राखी बांधतांना ब्र. कु. रंजन बहेन.



वाशी : डी. आय.जी. (CRPF) श्री. आर. एस. रौठेला यांना राखी बांधल्यानंतर भेटवस्तू देताना ब्र. कु. शीला बहेन.



शिर्डी : सी. आय. एस. एफ. च्या जवानांना राखी बांधतांना ब्र. कु. भारती बहेन, पूनम बहेन व योगिनी बहेन.



शहादा : 'तनावमुक्त जीवन' या कार्यक्रमाचे उद्घाटन प्रसंगी समाजसेवक सुरजित सिंग, डॉ. समुद्रे, डॉ. राजूभाई, ब्र. कु. नारायण भाई व ब्र. कु. विद्या बहेन.



शेगाव : नगरपालिकेचे मुख्याधिकारी श्री. शेळके यांना राखी बांधतांना ब्र. कु. शारदा बहेन.



चंद्रपूर : जन्माष्टमी महोत्सवानंतर ग्रुप फोटोत ब्र. कु. कुसुम बहेन व कुंदा बहेन तसेच झांकीत सहभागी कलाकार.



मालाड (जनकल्याण नगर) : मालवणी बस डेपोतील स्टाफला राखी बांधतांना ब्र. कु. मीना बहेन.



डोणोली (बांबवडे) : डॉक्टर श्री. महेश पाटील व त्यांच्या धर्मपत्नी यांना राखी बांधतांना ब्र. कु. विद्या बहेन.



# जैसे ज्याचे कर्म तैसे फळ देतो ईश्वर

**ब्र. कु. भगवान भाई, शांतिवन (आबू रोड)**

प्रत्येक व्यक्तीच्या जीवनात सुख आणि दुःख दोन्ही येत असतात. या जगात अशी कोणी व्यक्ती नाही जिला सुखाची इच्छा नाही वा सुखाची कामना नाही. प्रत्येकाला केवळ सुखच हवे असते. दुःख कुणालाच नको असतं. परंतु या कलियुगात अनेक लोक असे आहेत जे नेहमी दुःखी, अशांत व परेशान असतात. ते नेहमी स्वतःच्या दुःखाचे कारण इतरांवर थोपवितात. जर अमुक एक व्यक्ती माझ्या जीवनात आली नसती तर मी खूप सुखी राहिलो असतो. त्या व्यक्तीमुळेच माझ्या जीवनात अशी विपरीत परिस्थिती आली. अशा अनेक विचारांमुळे ज्या व्यक्तीपासून त्याला दुःखाचा आभास होतो त्याच्याविषयी मनात सदैव द्वेष, घृणा, वैर-विरोधाची भावना बाळगतो. त्याचबरोबर अशा दुःखद परिस्थतींना विसरण्यासाठी मनुष्य दारु, विडी, सिगारेट, मादक पदार्थांचे सेवन यांच्या आहारी जाऊन, आपले जीवन आणखीनच नर्कमय बनवित असतो. कित्येकांना आपल्या जीवनातील हे दुःख पर्वताएवढे वाटते. त्यातून मुक्त होण्यासाठी अनेकजण जीवघात सुद्धा करतात. अशी अनेक उदाहरणे आपण रोज वर्तमान पत्रातून वाचत असतो. **कित्येक जण जेव्हा दुःख सहन करू शकत नाहीत तेव्हा तर ईश्वरालाही दोष देतात. सरकारी यंत्रणेलासुद्धा दोष देतात. अशा नकारात्मक विचारांमुळे अथवा निराशेमुळे मनुष्य नैतिक मुल्य, सकारात्मक चिंतन, सत्यता, इमानदारी या सर्व गोष्टींपासून दूर जाऊ लागतो. परिणामतः दिन प्रतिदिन त्याच्या हातून अधिकच पापकर्म घडू लागते.**

एका अध्यात्मिक कार्यक्रमाचे प्रसंगी एक दारुड्या मला भेटण्यासाठी आला. त्याने मला विचारले की भाईसाहेब, मला दारु सोडायची आहे. त्यासाठी मी काय करू? त्यावर मी विचारले की तू दारु का पितोस? तो म्हणाला मला एका व्यक्तीने धोका दिला. त्यामुळे मला रात्रभर झोप येत नव्हती. सारखा तोच विचार पुन्हा-पुन्हा येत असे. कधी-कधी त्या माणसाचा खूप राग येऊ लागला हेता. माझी ही मनःस्थिती माझ्या मित्राला सांगितली तेव्हा त्याने मला दारु प्यायला सांगितले. तेव्हापासून मी दारु प्यायला सुरुवात केली. त्यावर मी त्याला विचारले, मग आता का सोडतोस? तेव्हा तो म्हणाला, 'भाईसाहेब, आता खूप त्रास होतो. माझी किडनीसुद्धा खराब होऊ लागली आहे. डॉक्टरांनी सुद्धा दारु सोडायला सांगितले आहे. पण माझ्याकडून मात्र सुटत नाही. आता मी काय करू?'

त्यानंतर मी त्याला पुन्हा प्रश्न विचारला की जेव्हा तू दारु प्यायला सुरुवात केलीस तेव्हा तूला ती कशी वाटली? तेव्हा तो म्हणाला की मला खूपच कडवट लागली. त्यावर मी त्याला सांगितले की तूला जीवनात धोका देणारी गोष्टसुद्धा कडवट होती व दारुसुद्धा कडवट होती. मग जर तू धोका देणारी गोष्ट मनातल्या मनात पिऊन टाकली असती तर तुला दारु पिण्याची गरजच वाटली नसती. परंतु **वर्तमान समयी जीवनात येणाऱ्या कडवट गोष्टींना पिण्याची अर्थात सहन करण्याची शक्ती मनुष्यात नाही. त्यामुळे आजचा मनुष्य जीवनात दुःखी व अशांत आहे. जर त्याच्या जीवनात ही शक्ती आली तर तो मानसिक, शारीरिक व सामाजिक दृष्ट्या सुखी होऊ शकेल.** इतकेच नव्हे तर विपरीत

परिस्थितीत सुद्धा, पापकर्मापासून दूर राहू शकेल. जसे चिखलामध्ये कमळ उमलते तसे कलियुगी पतित दुनियेत राहूनसुद्धा सुखी व संपन्न जीवन जगू शकेल. अशा प्रकारचे जीवन जगण्याची कला स्वयं परमपिता परमात्मा, ब्रह्माकुमारीज् संस्थेद्वारे सर्वांना शिकवित आहेत. जर आपण सहज राजयोगाचा नियमित अभ्यास केला तर जीवनात येणाऱ्या कोणत्याही विपरीत परिस्थितींना आपण सहज तोंड देऊ शकतो. **राजयोगाद्वारे आपल्यात सहनशक्ती, सामावून घेण्याची शक्ती, सामना करण्याची शक्ती, निर्णय शक्ती या सर्व शक्ती येतात. त्यामुळे प्रत्येकाने राजयोगाचा अभ्यास अवश्य करावा.**

वास्तविक तसं पाहिलं तर आपल्या जीवनात घडणाऱ्या ज्या काही सकारात्मक किंवा नकारात्मक घटना आहेत त्या आपल्याच पूर्व जन्मांच्या कर्माची फळे आहेत. जेव्हा आपण हे विसरून जातो तेव्हा आपण इतरांना त्यासाठी दोषी मानतो. टाळी कधी एका हाताने वाजत नसते. सध्या जर आपल्याला कोणी त्रास देत असेल तर असे समजायला हरकत नाही की आपण ही कोणत्या ना कोणत्या जन्मात त्या व्यक्तीला असा त्रास दिला होता. त्याचा तो हिशोब आता धेत आहे. सदैव लक्षात ठेवा की आपले जे नातेवाईक आहेत, शेजारी आहेत, मित्रमंडळी आहेत, ऑफीसमधील सहकर्मचारी आहेत, अलौकिक परिवार आहे त्यातील कोणी आपल्याला देण्यासाठी आले आहे तर कोणी घेण्यासाठी आले आहेत. देणे किंवा घेणे हेच जीवन आहे. आपण जर एखाद्या बरोबर चांगला व्यवहार केला असेल तर तो देखील आपले चांगलेच करणार आणि वाईट व्यवहार केला असेल तर तो देखील वाईटच व्यवहार करणार. कर्माच्या ह्या गुह्य गतिला जो नीटपणे समजतो तोच सुखी होतो. याउलट जो कर्माच्या गुह्य गतिला विसरतो तो दुःखी होतो. तात्पर्य म्हणजे आपल्याच कर्माच्या पेरलेल्या बीजामुळे सुख वा दुःख मिळत असते. सदैव लक्षात ठेवा आपल्या जीवनातील दुःखासाठी कोणी दुसरी व्यक्ती कारणीभूत नसून आपलीच चुकीची कर्मे आहेत. **त्यामुळे या दुनियेत लोकांना किंवा विपरीत परीस्थितीला घाबरु नका परंतु जर काय घाबरायचेच असेल तर चुकीच्या कर्माचे बीज टाकण्यासाठी घाबरा. मनात जरी वाईट अथवा चुकीचा संकल्प आला तरी त्या चुकीच्या कर्माला प्रत्यक्षात आणू नका.** कारण जर का एकदा चुकीचे बीज पेरले गेले तर त्याचे फळ कधी ना कधी भोगावे लागणारच.

संसार एक कर्मक्षेत्र आहे. काही लोकांना वाटते की येथे अन्याय होत आहे. परंतु लक्षात ठेवा या सृष्टीवर कोणतेही युग असो, येथे अन्याय कधीच होत नाही. काहीजण म्हणतात, हा मनुष्य इतका भ्रष्टाचारी आहे तरीसुद्धा किती संपत्तीवान, धनवान आहे. परमेश्वर अशा मनुष्यावर का मेहरबान आहे. दिवसेंदिवस त्याची प्रगतीच होत चालली आहे. वास्तविक हे त्याच्या मागील जन्मात केलेल्या श्रेष्ठ कर्माचे फळ आहे. आज तो जे चुकीचे कार्य करीत आहे. त्याचेही फळ त्याला लवकरच मिळेल. म्हणूनच म्हटले जाते, 'भगवान के घर देर है, मगर अंधेर नही।' एकदा का चुकीचे कर्म केले की त्यात परमेश्वरसुद्धा काही बदल करत नाही. परंतु काही कर्माची फळे याच जन्मात मिळतात तर काही कर्माची फळे मिळण्यासाठी अनेक जन्म घ्यावे लागतात. जेव्हा आपण ह्या कर्माच्या गुह्यगतिला समजतो तेव्हा आपण सकारात्मक बनून, प्राप्त परिस्थितीवर सहज मात करू शकतो व आपली जीवनरुपी नौका सहज पार करू शकतो. कर्माच्या गुह्य गतिविषयीची एक सत्य घटना मी याठिकाणी नमूद करू इच्छितो. ती आपल्याला खूपच बोधप्रद वाटेल.

काही वर्षापूर्वी मी दिल्ली पांडव भवनमध्ये ईश्वरीय सेवा करत होती. त्यावेळी दिवसा माझी सेवा किचनमध्ये आणि रात्रीच्या वेळी सेक्युरिटीची (पहाऱ्याची) सेवा होती. दिल्ली पांडव भवन हे रोहतक रोडवर असल्याने रात्रीच्या वेळी ट्रकची वाहतुक मोठ्या प्रमाणावर होत असे. पांडवभवनच्या समोर एक ट्रॅफिक पोलिसवाला ड्युटीसाठी रोज येत असे. मी त्या पोलिसवाल्याकडे अधून-मधून गेटवरुन बघत असे. तो ट्रकवाल्याला हात

दाखवित असे. ट्रक ड्रायव्हर त्याला पैसे देत व पुढे निघून जात असत. काही दिवसांनी तो पोलिसवाला माझ्याकडे पाणी पिण्यासाठी येऊ लागला. त्यामुळे माझी त्याच्याशी दोस्ती झाली. एक दिवस मी त्याला विचारले की तुम्ही ट्रकवाल्यांना थांबवून जे पैसे घेता, तो काय रोड टॅक्स असतो का? तुम्ही तो ऑफिसमध्ये जमा करता का? तेव्हा तो पोलिसवाला म्हणाला, 'तो काही तसा टॅक्स वगैरे नाही. परंतु ट्रकवाल्यांना वाटते की आपली गाडी शहरातून लवकर बाहेर पडावी म्हणून ते पैसे देऊन निघून जातात आणि जर कोणी पैसे दिले नाहीत तर मग त्याची गाडी बाजूला घेऊन आम्ही त्याची कागदपत्र तपासतो. त्यात काही ना काही त्रुटी असतेच. त्यामुळे त्याच्याकडून आणखी जास्ती पैसे मिळतात. हे पैसे ऑफिसमध्ये जमा करावे लागत नाहीत. त्यातील निम्मे पैसे साहेबाला द्यावे लागतात व बाकीचे पैसे आपले. त्यावर मी त्यांना म्हणालो, तुम्ही जर रक्षकच असे करत असाल तर बाकीचे काय करतील? तेव्हा तो पोलिसवाला म्हणाला, सर्वच जण असे करतात म्हणून आम्हीसुद्धा करतो. पुढे मी विचारले, सर तुम्हाला पगार तर मिळत असेलच ना? तेव्हा तो म्हणाला की पगार तर मिळतोच पण भविष्याची तयारी करावी लागते. माझे स्वतःचे एक घर आहे, गाडी आहे, मुलगा इंजिनियरींग करतोय. त्याचाही होस्टेलचा मोठा खर्च होतो. बाकी घरच्यांच्या सर्व मागण्या पुरविण्यासाठी पैसा हा जमा करावा लागतोच. नुसत्या पगारावर काय होतय? आम्ही ट्रॅफिकवाले तर दिवसभर पैशासोबतच खेळत असतो. आमच्यासाठी तर जणू काय आताच स्वर्ग आहे. तुम्ही तर घरदार सोडून येथे सेवा करता. हे काय जीवन आहे? अशा प्रकारची चर्चा अधून-मधून होत असे. तरी मी त्याला मोठ्या युक्तीने ईश्वरीय ज्ञान सांगण्याचा प्रयत्न करीत असे. त्यावर त्याचे एकच म्हणणे असे की आमच्या पोलिस खात्याला या ज्ञानाची गरजच नाही. कारण आमच्या जीवनात काही दुःखच नाही.

परंतु एक दिवस तो पुलिसवाला जेव्हा ड्युटीवर आला होता तेव्हा तो पांडव भवनमध्ये पाणी पिण्यासाठी आला. त्यावेळी त्याच्या चेहऱ्यावर नैराश्याची छटा होती व काहीही बोलत नव्हता. तेव्हा मी त्याला विचारले, 'सर, आज काय घडलं? आपण एकदम गप्प-गप्प दिसतायं. त्यावेळी त्या पोलिसवाल्याने आपले मनोगत व्यक्त केले. आज दुपारी माझ्या मुलाच्या कॉलेजमधून टेलिफोन आला होता की माझा मुलगा कॉलेजच्या होस्टेलमधून तीन दिवसापासून पळून गेला आहे. त्यानंतर मी त्याच्या मित्रांना फोन केला. तेव्हा मला समजले की तीन दिवसापूर्वी माझ्या मुलाने एक मुलीबरोबर प्रेमविवाह करून कुणाला न सांगता, होस्टेलमधून निघून गेला आहे. माझा हा एकुलता एक मुलगा, ज्याला मी अतिशय प्रेमाने वाढवलं. त्याच्या सर्व इच्छा पूर्ण केल्या. त्याला काहीसुद्धा कमी पडू दिल नाही. डोनेशन देऊन त्याला इंजिनियरींगला पाठवलं. परंतु आज त्याच मुलाने मला खूप मोठा धोका दिला. त्याने प्रेमविवाह केला म्हणून मी नाराज नाही. परंतु मी भविष्यासाठी जेवढा पैसा बँकेत जमा करून ठेवला होता तो घेऊन तो पसार झाला. कारण ए.टी.एम. कार्ड त्याच्याकडेच होते. त्यावेळी मी फक्त त्यांना एवढंच सांगितले की सर, ते पैसे कमवले कसे होते? काही दिवस तो पोलिसवाला खूप दुःखद मनःस्थितीत राहिला. टेंशनमुळे दारु पिऊ लागला. परंतु त्याला आपल्या चुकीच्या कर्माचाही पश्चाताप झाला होता. त्यामुळे हळूहळू ज्ञान ऐकत नंतर तो राजयोगी बनला. त्याचा परिवारही ज्ञानात आला. आता तो ब्रह्माकुमारी विद्यालयाचा नियमित विद्यार्थी बनून, खऱ्या स्वर्गात जाण्याचा पुरुषार्थ करीत आहे.

ही तर केवळ या जन्मातील कर्माविषयीची सत्य घटना तुम्हाला सांगितली. परंतु आजवर आपण जन्मोजन्मी अभिमानवश कित्येकांना दुःख दिले असेल, कळत नकळत कमी-अधिक प्रमाणात पापाचार, हिंसाचार, भ्रष्टाचार केला असेल, प्रकृतीचा दुरुपयोग केला असेल, ते सर्व आपल्याला आता इथेच (या अंतिम

**(पान क्र. ३२ वर)**




# यथार्थ सेवेची विधी

**ब्र. कु. शैलजा, अहमदनगर**

यज्ञाच्या सुरुवातीच्या काळात (सन १९३६ ते १९५०) सुमारे १४ वर्षे यज्ञवत्सांनी तपस्या केली. त्याकाळात बाहेरची सेवा नव्हती. त्यावेळी पिताश्री ब्रह्माबाबा यज्ञवत्सांना सेवेसाठी लायक बनवित होते. बाबा रोज त्यांना कुठल्या ना कुठल्या विषयावर लिहायला सांगत. एखाद्या टॉपिकवर मनन चिंतन करून त्यावर भाषण करायला सांगत. जणू भविष्यात त्यांच्याद्वारे होणाऱ्या सेवेसाठी बाबा त्यांना ट्रेनिंग देत होते. सेवा करण्यासाठी त्यांची स्थिती श्रेष्ठ बनवित होते. **कारण यथार्थ सेवेची विधी आहे, आपल्या श्रेष्ठ स्थितीद्वारे केलेली निस्वार्थ आत्मिक सेवा. तात्पर्य म्हणजे सेवाधारीची स्थिती श्रेष्ठ असेल तर सेवाही आपोआपच श्रेष्ठ असेल.**

सन १९५९ मध्ये सुद्धा आपल्या संस्थेची संपूर्ण भारतात केवळ ११ सेंटर्स होती. त्यामुळे शिवरात्रीचा पर्चा छापतांना त्यात सगळ्या सेंटर्सची माहिती दिली जात असे. त्यावेळी एखाद्याला ज्ञान समजावून सांगतांना हाच उद्देश्य असे की हा आत्मा शिवबाबांचा बनलाच पाहिजे. तसेच रोजचा सेवा समाचार मधुबनला पाठविला जात असे. सुरुवातीला फक्त त्रिमूर्ती व झाड हेच दोन चित्र होते. पुढे सन १९६२ मध्ये दिवंगत वरिष्ठ भ्राता राजयोगी रमेश भाईंनी आध्यात्मिक प्रदर्शनीचे चित्र बनवले व त्यातून सेवेत झपाट्याने वृद्धी होत गेली. पहिल्या प्रदर्शनीचे उद्घाटन महाराष्ट्राचे राज्यपाल यांनी मुंबईत केले होते. या प्रदर्शनीला लोकांकडून खूपच चांगला प्रतिसाद मिळाला होता.

### सेवा व सेवाधारीची स्थिती

वास्तविक सेवा व सेवा करणाऱ्या निमित्त सेवाधारीची स्थिती यांचा फार घनिष्ठ संबंध आहे. त्यामुळे बाबा मुलांच्या स्थितीकडे फार लक्ष देत असत. एकदा दिल्लीत एका धार्मिक स्थळी तेथील ट्रस्टींनी ज्ञान सांगण्यासाठी जागा दिली होती. त्या जागेवर त्रिमूर्ती व झाड ही दोन चित्र लावण्यात आली होती. त्यातील एक चित्राच्या खाली बरेच काही लिहिले होते. त्यात असे लिहिले होते की 'रामकी सीता चुराई नही गयी थी।' ते मंदीर होते श्रीरामाचे. तेव्हा त्या सेवाधारी बहिणीने काय केले? त्या चित्राखालील तो मजकूर काढून टाकला. जेव्हा बाबांना ही गोष्ट समजली तेव्हा बाबांनी त्यावर मुरली चालवली व समजावून सांगितले की ईश्वरीय ज्ञानाची सत्यता पटवून देण्यासाठी, आपली स्थिती निर्भय व निश्चिंत बनवा.

### सेवाधारीच्या मनातील भावनेचे महत्त्व

**ईश्वरीय सेवा ही नेहमी आत्मिक भाव तसेच सर्वांप्रती समभाव ठेऊनच केली पाहिजे. कुणाही आत्म्याची सेवा करतांना मनात हा संकल्प उत्पन्न होता कामा नये की या आत्म्यापासून व्यक्तिगत स्वत:ला वा यज्ञाला काय फायदा होईल? ईश्वरीय सेवा ही नेहमी निस्वार्थ भावनेने केली पहिजे.** प्रत्येक आत्मा हा परमात्मा शिव पित्याचा प्रिय बालक आहे. माझा आत्मिक बंधु आहे. त्यालाही परमात्मा पित्याकडून मुक्ती-जीवनमुक्तीचा वारसा मिळावा, हीच आपली शुभभावना असली पाहिजे. त्यामुळे कुणाचेही स्टेटस् वा पोझीशन पाहून ईश्वरीय सेवा करणे, तितकेसे योग्य नाही. तात्पर्य म्हणजे आपण शिवबाबांची मुले आहोत. ज्ञान देणारे

ज्ञानदाता आहोत. त्यामुळे आपण कुणाकडून कसलीही अपेक्षा करणे, हे चुकीचे आहे. किंबहुना ही यथार्थ सेवा नव्हेच.

**स्थिती, सेवा व भविष्य पद**

सेवाधारीची स्थिती, सेवेच्या मागील भाव तसेच भविष्य पद यांचा घनिष्ठ संबंध आहे. आजही आपण पहातो की मंदिरात आपल्या मूर्तीपुढे भक्तगण भोग लावण्यासाठी रांगेत उभे असतात. मूर्ती कधीही हे पहात नाही की कोण काय भोग लावत आहे. मूर्ती प्रत्येकाला वरदान देत असते. तसेच आपणही सर्व आत्म्यांच्या प्रती समान भाव ठेवला पाहिजे. **सेवाकेंद्रावर येणाऱ्या प्रत्येकाला अनुभव आला पाहिजे की हे माझ्या बाबांचे घर आहे, माझे घर आहे. प्रत्येकाला आपलेपणाची फिलींग आली पाहिजे. ही आहे खरी सेवा.**

**सेवाधारीची मुख्य विशेषता**

सेवाधारीची मुख्य विशेषता ही आहे की कसाही आत्मा असला तरी त्याला विशेष आत्मा जरूर बनवता आले पाहिजे. सूर्य जसा वातावरण बदलून टाकतो तसेच आपल्या उपस्थितीने सुद्धा नकारात्मक वातावरण सकारात्मक बनले पाहिजे. नकारात्मक वातावरणाचा प्रभाव आपल्यावर पडता कामा नये. आपल्या श्रेष्ठ स्थितीद्वारे सेवा झाली पाहिजे. आपल्या प्रत्येक संकल्प, बोल व कर्मात सेवा असली पाहिजे. याविषयी एक प्रसंग नमूद करावासा वाटतो.


एकदा राजयोगी जगदीश भाई मधुबनला आले असतांना, भल्या पहाटे उठून ते मोकळ्या हवेत योगाला बसले होते. त्यांना योगाची फारच आवड होती. त्यांच्या जवळून दादी प्रकाशमणी जात असतांना त्यांनी पाहिलं की एवढ्या थंडीत शाल वगैरे न घेता जगदीशभाई योगात बसले आहेत. तेव्हा त्या म्हणाल्या की सध्या खूपच थंडी पडली आहे. त्यामुळे थंडीपासून संरक्षणासाठी शाल पांघरणे आवश्यक आहे. असे सांगून त्या आपल्या रुमवर गेल्या व जगदीश भाईंसाठी लगेच दुसरी शाल घेऊन आल्या. ती शाल त्यांनी जगदीशभाईंना दिली. अशाप्रकारे दादीजींनी आपला संकल्प लगेचच कृतीत आणला. ही आहे यथार्थ सेवा.


आजकाल आपण पहातो की लोकांना ज्ञान ऐकायची फारशी इच्छा नाही. परंतु त्यांना हवी आहे शांती, प्रेम, आनंद व सुख. या गोष्टी जर आपण त्यांना आपल्या श्रेष्ठ स्थितीद्वारे देऊ शकलो तरच ते ज्ञानाकडे आकर्षित होतील. त्यामुळे ईश्वरीय ज्ञानदानाच्या सेवेसाठी सर्वप्रथम आवश्यक आहे श्रेष्ठ स्थिती. **म्हणूनच आधी आपली स्थिती श्रेष्ठ बनवा. बाहेरच्या वातावरणाचा विचार करू नका. दुसऱ्यांना आपण बदलू शकत नाही. परंतु स्वतःला मात्र जरुर बदलू शकतो. त्यामुळे आपली स्थिती बापसमान बनवा व त्या स्थितीद्वारे अगदी मनापासून सर्व आत्म्यांची निस्वार्थ सेवा करा. हीच आहे यथार्थ सेवेची विधी.** या अनुषंगाने परमात्मा शिवपित्याची पुढील महावाक्ये सदैव लक्षात ठेवा – **''सेवाभाव अर्थात सदा हर एक आत्मा के प्रति शुभ भावना, श्रेष्ठ कामना का भाव। सेवाभाव अर्थात हर आत्मा को भावना प्रमाण फल देना। ऐसी सेवा में तपस्या सदा साथ है। तपस्या का अर्थ है – दृढ संकल्प से कोई भी कार्य करना। 'त्याग–तपस्या–सेवा' इन तीनों का कम्बाइण्ड रुप सच्ची यथार्थ सेवा है। अनुभूति कराना अर्थात बाप से सम्बन्ध जुडवाना, शक्तिशाली बनाना – यह है सच्ची यथार्थ सेवा।''** (अ.वा.९/४/१९८६)

***

अमृतकुंभच्या सर्व वाचकांना दीपावलीच्या तसेच नववर्षाच्या हार्दिक शुभेच्छा! आपणा सर्वांना नवीन वर्ष अतिशय सुख, शांती व समृद्धीचे जावो, हीच मंगलकामना!

– प्रकाशक अमृतकुंभ





# संगमयुगी ब्राह्मण जीवनात प्राप्त करावयाच्या सोळा कला

## (भाग – १)

**ब्र. कु. जगदीश दीक्षित, पुणे**

निवासस्थानाची इमारत जुनी झाली की, तिचा मालक त्या इमारतीचे नूतनीकरण करतो. फलस्वरुप ती इमारत पुन्हा नव्यासारखी दिसू लागते. तद्वतच ह्या पुरुषोत्तम संगमयुगावर आत्म्यांचा एकमात्र मालक असलेला परमात्मा (सर्वधर्मातील सर्वआत्म्यांचा विदेही परमपिता) आत्म्यांचे नूतनीकरण करून पापात्म्यांचे पुण्यात्म्यात व पुण्यात्म्याचे देवात्म्यात परिवर्तन करतो. **बंधुनो, आत्म्याने प्रथमतः परमधामातून ह्या साकार सृष्टीवरील सत्ययुगी स्वर्गात ज्या पावन स्थितीत जन्म घेतला होता तीच पावन स्थिती परमात्मा त्याला त्याच्या ८४ व्या अलौकिक जन्मात प्रजापिता ब्रह्माद्वारे पुनः प्राप्त करवून देतो. प्रत्येक पाच हजार वर्षांनी कल्प कल्प आत्म्याचे असे आश्चर्यकारक नूतनीकरण करणारा केवळ निराकार परमात्माच आहे.** ह्या प्रक्रियेत एका कल्पात ८४ जन्म प्राप्त करणाऱ्या श्री. लक्ष्मी नारायणाच्या आत्म्यांचेही नूतनीकरण केले जाते. अर्थात परमात्मा आत्म्याला सर्व दैवी गुणसंपन्न, पवित्रतेच्या सोळा कला संपन्न, संपूर्ण निर्विकारी व अहिंसक द्विमुगुटधारी देवता बनवितो. स्वपुरुषार्थाद्वारे आत्म्याला सतोप्रधान स्थिती प्राप्त झाल्याच्या कारणे सत्ययुगात त्याला योगबलाद्वारे निर्माण झालेले सतोप्रधान शरीर प्राप्त होते. देवात्म्याचे ते शरीर इतके सुंदर निरोगी व पवित्र असते की, त्याच्या कर्मेंद्रियांना मुखकमल, कमल नयन, कमलचरण, कमल कर्ण, शीर कमल इ. म्हटले जाते. त्या मायारहित स्वर्गीय विश्वाला असे म्हणता येणार नाही की, 'झूठी माया, झूठी काया, झूठा है सब संसार।' त्या सत्ययुगाचे असे गायन करता येईल की, 'वहाँ नही होती है माया, मिलती है सभी को सच्ची काया, कितना सच्चा था वह स्वर्गीय संसार!' पापात्म्याचे पुण्यात्म्यात, पुजाऱ्याचे पूज्य रुपात व असुरांचे नूतनीकरण करून त्यांना सुर अर्थात देवता बनविणे व त्यांच्यासाठी कलियुगी नर्काचे नूतनीकरण करून त्याला स्वर्गात रुपांतरित करणे हा परमात्म्याचा महान चमत्कार नव्हे काय? जोपर्यंत लाखोंच्या संख्येत परमात्मा पापात्म्यांचे नूतनीकरण करून देवात्म्यात रुपांतर करीत नाही तोपर्यंत भारताचे ही नूतनीकरण होवून लोहयुगाचे सुवर्णयुगात परिवर्तन होवू शकणार नाही. त्यासाठी पौर्णिमेच्या चंद्राप्रमाणे पवित्रतेच्या सोळा कला संपन्न बनण्यासाठी ब्रह्मावत्सांनी ह्या लेखातील सोळा कलांचा अभ्यास व पुरुषार्थ अवश्य करावा.

**१) मित्र बनविण्याची कला –** ब्राह्मण परिवाराचे परिक्षण केल्यावर असा निष्कर्ष निघतो की, बहुतांश ब्रह्मावत्स केवळ ब्राह्मण परिवाराशीच मैत्रीचे संबंध ठेवू इच्छितात. शिवबाबांनी आपल्या ज्ञानमुरलीत स्पष्ट केले आहे की, 'आपको सर्वका प्यारा और न्यारा बनना है।' आपल्या सर्वांना विश्वामित्र बनावयाचे नाही, परंतु सकल विश्वाचा मित्र अवश्य बनावयाचे आहे. त्यासाठी मित्र बनविण्याची कला आत्मसात करावयाची आहे. ज्याचा आपल्याशी बऱ्यापैकी संबंध आहे त्याला मित्र बनविणे सहज असते. परंतु आपल्यावर टीका करणाऱ्याला व शत्रूलाही मित्र बनविणे हा महान पुरुषार्थ आहे. पिताश्रींना मारण्यासाठी आलेल्या मारेकऱ्याला व वृत्तपत्रात त्यांच्यावर टीका करणाऱ्या टीकाकारालाही त्यांनी आपला मित्र बनविले. असा पुरुषार्थ करण्यासाठी पुढील धारणांची आवश्यकता आहे. १) संबंध संपर्कात येणाऱ्या मनुष्याविषयी शुभ भावना व

शुभकामना ठेवाव्यात. २) सर्वांशी सुसंवाद साधावा. ३) त्यांनी स्विकारलेल्या आध्यात्मिक मार्गाचा आदर करावा. त्यांच्या गुरुंची स्तुती करावी. ४) स्वभावात सरलता व वाणीत मधुरता ठेवून त्यांना श्रीमतानुसार यथायोग्य साह्य अवश्य करावे. मित्र परिवार मोठा असेल तर कोण कधी व कशी मदत करेल हे सांगता येणार नाही. म्हणून सर्वप्रथम परमात्म्यालाच आपला मित्र बनवा.

**२) सद्व्यवहार करण्याची कला व लोकरंजनाची कला –** ह्या भ्रष्टाचारी समाजात कोणताही व्यवहार करताना तो अत्यंत काळजीपूर्वक करावा. एखाद्या माणसाकडून फसविले जाणे ह्यासारखे दुःख नाही. **व्यवहार असाच करावा की, देणारा व घेणारा दोघेही खुश झाले पाहिजेत. सुखाचा जीव दुःखात न टाकण्यासाठी व खुशी स्थायी राहण्यासाठी शक्यतो कोणालाही हात उसने पैसे देऊ नयेत.** हात उसने पेसे देणे किती घातक ठरू शकते ह्याचे उदाहरण हे आहे की, एका मित्राने आपल्या दुसऱ्या मित्राला वीस लाख रुपये उसने दिले. मुदत संपल्यावरही तो मित्र काही पैसे परत देण्याचे कोणतेही आश्वासन देत नव्हता. त्याचा दुष्परिणाम असा झाला की, पैसे देणाऱ्या मित्राने आपल्या कुटुंबाला संपविले व स्वतः जीवहत्त्या केली. जवळच्या संबंधियांना उसने पैसे द्यावेच लागले तर ते परत मिळण्याची अपेक्षा ठेवू नये. राजयोग्याने असे व्यवहार कधीही करू नयेत. तसेच कोणत्याही प्रलोभनाला बळी न पडता फिरत्या विक्रेत्याकडून किंमती वस्तू विकत घेवू नयेत. विश्वासघात करणे हा ह्या युगाचा मोठा दुर्गुण आहे. म्हणून दुकानातून पावतीसह वस्तू विकत घ्यावी. उधारी शक्यतो ठेवू नये. ती उधारी वेळेवर देता आली नाही तर कर्मबंधन निर्माण होण्याची शक्यता असते. संगमयुगाचा समय कर्मबंधन मुक्त होण्याचा आहे.

लोकरंजन ही अशी कला आहे की, ज्या कलेमुळे मनुष्यात्म्यांच्या दुःखी जीवनात आनंदाचे क्षण निर्माण होतात. लोकरंजन करणारा कलाकार अन्य आत्म्यांच्या मनावरही राज्य करतो. त्यांच्याविषयी समाजातील लोक चर्चा ही करीत असतात. लोकरंजनात चित्रपट, दूरदर्शन व नाटकांचा सहभाग आहे. कलाकारांचे हे नैतिक कर्तव्य आहे की, करमणूक करीत असताना मनुष्यात्म्यांचे आत्मिक पतन होणार नाही अशीच दुश्ये, गाणी व संवाद सादर करावेत. प्रत्येक मनुष्याने चिंतन करावे की, मज आत्म्यात लोकरंजनाचे कोणते गुण आहेत? **लेखकाच्या लौकिक नात्यात एक असा बी. के. आहे की त्याने सेवानिवृत्तीनंतर शास्त्रीय संगीताचे शिक्षण घेतले. तो आता बी. के. सहकाऱ्यांसहित आपल्या कलेद्वारे ईश्वरीय संदेश देण्याचे कार्य करीत आहे. लोकरंजनाबरोबरच लोकांची आध्यात्मिक उन्नती कशी करावी हे त्या कार्यक्रमातून शिकण्यासारखे आहे.** रथी महारथी आत्मेही विनोद अवश्य करतात परंतु त्यांच्या प्रवचनाचा उद्देश आत्मोन्नतीचाच असतो. आजकाल आत्मिक पतन करणाऱ्या चारित्र्यहीन चित्रपटांची निर्मिती अधिक होत आहे म्हणून परमात्म्याने म्हटले आहे, 'सिनेमा सीन की (पापोंकी) माँ है। और टीव्ही मनका टी.बी. है।' दूरचित्रवाणीवरील मालिकांचे शीर्षक पाहूनच समजते की, ह्या मालिका अत्यंत तमोप्रधान असाव्यात उदा. 'माझ्या नवऱ्याची बायको व जीव झाला येडापीसा इ. तुम्हाला करमणूकच करून ध्यायची असेल तर 'पीस ऑफ माईंड' जरूर पहावे. लोकरंजनाची कला सत्ययुगातही आवश्यक आहे. ज्या ब्रह्मावत्सांनी मनोरंजनाची कला आत्मसात केली आहे व जे संगम युगावर दिव्य गीत गाऊन अन्य आत्म्यांचा बुद्धियोग परमात्म्याशी जोडतील तेच सत्ययुगी स्वर्गीय संगीत गाणारे गंधर्व बनतील.

**३) स्वतःचे व अन्य आत्म्यांचे सकारात्मक परिवर्तन करण्याची कला –** स्वपरिवर्तन तोच आत्मा करू शकतो. ज्याला आपल्या अवगुण व कमी कमजोरीचे ज्ञान आहे. अशी कमी कमजोरी ज्ञान व योगाच्या आधारे नष्ट करता येते. स्वपरिवर्तनाचे सर्वात मोठे उदाहरण आहे भूतपूर्व डाकू पंचमसिंगाचे. कारागृहामध्येच ईश्वरीय ज्ञान श्रवण करून डाकू पंचमसिंग राजयोगी पंचमसिंग कधीच बनला आहे. सूक्ष्म रित्या पाहिले तर आजचा सर्वसामान्य मनुष्यही कामक्रोधादि ह्या पाच डाकूंच्याद्वारे आत्म्याचे (स्वतःचे) पवित्रता रुपी धन

लुटत आहे. जो साधक पाच विकारांच्यावर मात करून स्वपरिवर्तन करतो तोच संपर्कात येणाऱ्या अन्य आत्म्यांचे परिवर्तन करू शकतो. म्हणून म्हटले जाते ‘स्वपरिवर्तन हाच विश्वपरिवर्तनाचा आधार आहे.’ दुसऱ्याचे परिवर्तन करताना प्रथमतः त्याच्या जवळ असलेल्या गुणांची वाहवा करावी. तद्वतच त्याने केलेल्या समाज कार्याची महिमा करावी व असेच कार्य आपण परमात्म्याच्या मार्गदर्शनाप्रमाणे कराल तर जन्मजन्मांतराचे कल्याण कसे होईल हे पटवून द्यावे. अशाप्रकारे स्नेहाच्या आधारे आपण त्याचे परिवर्तन करू शकतो. बंधुनो, एक दिवस असा येईल की, परमात्म्याच्या प्रत्यक्षतेची व परिवर्तनाची लाटच ह्या विशाल भवसागरात निर्माण होईल.

**४) मनाला सदा प्रसन्न ठेवण्याची कला –** एखाद्या व्यक्तीने दुर्व्यहार करून आपले आर्थिक नुकसान केले तर मनाची प्रसन्नता क्षणार्धात नाहीशी होते. म्हणून १) साधकाने व्यवहार दक्ष रहावे. २) ज्ञानयुक्त दृष्टिकोन ठेवावा. ३) परिस्थितीमुळे स्वस्थिती बिघडणार नाही ह्याचे अटेंशन ठेवावे. त्यासाठी ‘मै मास्टर सर्वशक्तिवान हूँ।’ ह्या स्वमानाचा अभ्यास करावा. काळजी घेऊनही काही शारीरिक व्याधी झाली तर सकारात्मक संकल्प करावा की, मज आत्म्याची पावन बनण्याची प्रक्रिया तीव्र गतीने होत आहे. (योग+कर्मभोग) ह्याविषयी मम्मा-बाबांचे आदर्श उदाहरण आपल्या सर्वांच्या समोर आहे. जो ज्ञानी तू आत्मा ह्या ड्राम्यातील भिन्न भिन्न घटना साक्षी भावाने पहातो, तसेच कोणत्याही प्रसंगी त्याच्या काळजाचा ठोका चुकत नाही, तोच सदा प्रसन्नचित राहू शकतो. प्रसन्नतेचा आधार आहे– आत्म्याची शक्तिशाली व पवित्र स्थिती! **सर्वात महत्त्वाचा ज्ञानबिंदू तर हाच आहे की, ज्याचा योग प्रसन्नतेचा सागर असलेल्या परमात्म्याशी आहे तोच मा. प्रसन्नतेचा सागर बनू शकतो. प्रसन्नतेचा मूळ आधार पवित्रता असल्याने देवी देवतांच्या मुखमंडलावर प्रसन्नता दर्शविली जाते.**

(क्रमशः) ***

## रामराज्य व रावणराज्य

**वर्तमान समयी सकल विश्वावर राज्य आहे माया रावणाचे**
**कलियुगात हा रावणच वातावरण निर्माण करतो नर्काचे ।।१।।**
**ह्याची भारतात स्वर्गीय सुखाचे राज्य होते श्री लक्ष्मी नारायणाचे**
**‘डाल डाल पर सोनेकी चिडियाँ’... हेची गायन आहे सत्ययुगाचे ।।२।।**
**भारतातील देवात्म्यांच्या दोन कला घटताच त्रेतायुग आले**
**श्री सीतारामाच्या बारा पिढ्यांनी येथे सुखशांतीने राज्य केले ।।३।।**
**द्वापरयुगापासून रामराज्याचा अंत होऊनी रावण राज्य आले**
**राजासहित प्रजा व राज्याधिकारीही इंद्रियांचे गुलाम झाले।।४।।**
**आत्म्याची विस्मृति झाल्याने नरनारी स्वतःला देह मानू लागले**
**आत्मिक सुखाऐवजी दैहिक सुखाचे आकर्षण निर्माण जाहले ।।५।।**
**दशाननाने मायाजाल पसरवूनी पतन केले मनुष्यात्म्यांचे**
**जे पावन पूज्य होते तेची पुजारी जाहले आपुल्याच जड मूर्तींचे ।।६।।**
**‘काम महाशत्रू आहे’ गीतेतील महावाक्य हे स्वयं परमात्म्याचे।**
**शत्रूलाच आपला मित्र मानल्याने पतन जाहले आत्म्यांचे ।।७।।**
**जो आत्मा ह्या महाशत्रूला योगाग्नीने भस्म करूनी विजयी होईल**
**तोच आत्मा स्थापन होणाऱ्या रामराज्यात दैवीजन्म प्राप्त करेल ।।८।।**
**रामराज्य स्थापन कोण करतो? हे ज्ञात नव्हते त्या राष्ट्रपित्याला**
**कल्प-कल्प रामराज्य स्थापन करावेच लागते जगत्पित्याला ।।९।।**
**रामराज्याच्या ह्या निर्मितीसाठी जगत्पित्याला सहयोग देऊया**
**असे राज्य निर्माण करूनी बापू गांधीचीही अपेक्षा पूर्ण करुया ।।१०।।**
**कधी रामराज्याचा तर कधी अधिकार असतो, रावणराज्याचा**
**रामराज्य व रावणराज्याचा खेळ हा असाच चालतो कल्पकल्पांचा ।।११।।**

**– ब्र. कु. जगदीश दीक्षित, पुणे**

**(पान क्र. १४ वरून)**

याउलट जर सेवा असफल झाली तर खूप दुःखी. वास्तविक यातही अनासक्त भाव असणे आवश्यक आहे. ना जास्त खुशी ना जास्त दुःखी. एकदम स्थिर (Stable) ही स्थिती अनासक्त वृत्तीनेच येते. जो योगी अनासक्त आहे तोच अचल-अडोल बनतो. त्यामुळेच आपल्या कर्मामध्ये अनासक्त भाव असणे जरुरीचे आहे. कर्म केले व एकदम अनासक्त; कर्म व त्याचा प्रभाव, कर्माची सफलता व त्याचा प्रभाव, कर्म व त्याचे फळ या सर्वांपासून अनासक्त. असे जर कर्म असतील तर ते जीवन नक्कीच कर्मयोगी जीवन होय. जो साधक कर्म करताना त्यात आसक्त होऊन जातो तो कर्मयोगी बनू शकत नाही. सेवा केली, सफल झाली खूप फोटो काढले व तेच फोटो पहाणं चाललय कित्येक दिवस. सेवेचं सतत कौतुक चालू आहे. याचा अर्थ कर्मामध्ये आसक्ती निर्माण झाली आहे. यज्ञाचा इतिहास आपण ऐकलाच आहे. मातेश्वरी मम्मा तीन महीने सेवेसाठी बंगलोरला गेल्या होत्या. त्या तीन महिन्यात मम्मांनी तेथे खूप सेवा केली व तीन महिन्यानंतर मम्मा मधुबनला परत आल्या. तेव्हा त्यांना विचारले की 'मम्मा सेवा कशी झाली?' मम्मांनी अगदीच थोडक्यात उत्तर दिले की 'सेवा छान झाली बस फुलस्टॉप. मम्मांनी सेवेचे काहीच वर्णन केले नाही. मम्मांच्या ऐवजी कोणी दुसरा असता तर आम्ही इकडे गेलो, तिकडे गेलो, हे केले, ते केले, इतक्या लोकांना ज्ञान दिले, असे केले आणि तसे केले. किती वर्णन केले असते. फोटो, न्यूजपेपर दाखवले असते. कर्म कसे झाले? आसक्तीने भरपूर की अनासक्त? कर्मयोगी अर्थात अनासक्त. कर्म केले आणि विसरून जा एकदम फुलस्टॉप. दुसऱ्या एका भाईने नंतर मम्मांनी केलेल्या सेवेचे वर्णन केले परंतु मम्मांनी काय सांगितले, 'सेवा छान झाली'. बस जास्त वर्णन वा विस्तार काहीच नाही. नाहीतर आपण सेवा समाचार सोशल मिडीयामध्ये पेपरमध्ये, मासिकामध्ये टाकतो. टिव्हीवर दाखवतो. हे सेवेसाठी आवश्यक आहे पण त्या सेवेच्या सफलतेशी भावनिक आसक्ती नकोच. कर्मयोगी जीवन अर्थात प्रत्येक कर्म कसे असावे? एकदम अनासक्त!

**सकारात्मक भाव**

कर्मयोगी जीवनासाठी तिसरी आवश्यक गोष्ट आहे सकारात्मकता (Positivity) कोणतीही परिस्थिती असो त्यात कल्याणच दडलेले आहे. या सृष्टी नाटकामध्ये अथवा ड्रामामध्ये असे काहीच नाही ज्यात अकल्याण आहे. एका अव्यक्त मुरलीत सांगितले होते. अपघात झाला तरी त्यात कल्याणच. जे काही जीवनामध्ये घडत आहे त्यात एक रहस्यच दडलेले आहे. जे काही घडतेय ते असेच उगाचच घडत नाही. प्रत्येक गोष्टीला, घटनेला कारण आहे आणि त्यासाठी तक्रार ती काय करायची? यज्ञाच्या सुरुवातीची कहाणी आहे. जेव्हा भारत आणि पाकिस्तानचे विभाजन झाले तेव्हाची. एक माता होती. यज्ञ सिंध कराची वरून आबू येथे आला. तर त्यावेळी त्या मातेच्या घराला आग लावली गेली. आगीत घर जळत होते व ती माता आत बसली होती आणि पाळण्यात दोन छोटी बाळे होती. तर त्या मातेने काय केले? जे कोणतीच माता करू शकली नसती. संपूर्ण घराला आगीने वेढले होते त्यातून ती स्वतःला कशी वाचवू शकली असती. तीने काय केले खिडकीजवळ गेली. पण खिडकी थोडीशी उंचावर होती. त्यातून बाहेर उडी मारायची होती. तिने दोन्ही बाळांना पायाखाली घेतले व खिडकीतून उडी मारुन ती बाहेर आली. परिणामी ती दोन्ही बाळे आगीत जळून गेली. त्यानंतर काही वर्षांनी ती माता ज्ञानात आली. तेव्हा तिने बाबांना विचारले माझ्या जीवनातील या घटनेत काय कल्याण झाले? मी तर आपल्या दोन्ही बाळांना जिवंतपणी आगीच्या भक्ष्यस्थानी देऊन टाकले. त्यांना मारुन टाकले, यात काय कल्याण झाले बाबा? बाबांनी काय उत्तर दिले असेल? बाबा म्हणाले, 'जर ते झाले नसते तर 'हे' पण झाले नसते.' आपल्या हातून दोन बाळे मारली गेली ही अपराधीपणाची भावना मनात भरली असल्याने ती माता खूप दुःखी झाली होती आणि त्या

दुःखानेच तिला शिवबाबांकडे आणले होते.

ड्राम्माचे प्रत्येक दृश्य कल्याणकारी आहे. ज्यात वरकरणी नुकसान होताना दिसत आहे तरी त्यात ही फायदाच आहे असा भाव असला पाहिजे. जे घडत आहे ते आपल्या जन्मोजन्मीच्या कर्माचे फळ आपल्या समोर येत आहे. त्यामुळेच आपल्याला असं म्हणण्याचा अधिकार नाही की हे जे घडत आहे ते चुकीचे आहे, असे व्हायला नको होते. परमेश्वराने आमच्यावर अन्याय केला आहे हा विचारच मनात येऊ शकत नाही कारण आपणच केलेल्या कर्माची फळे आपल्या पदरी पडत असतात. वर्तमानमध्ये जे घडत आहे ते आत्म्यांच्या जन्मजन्मांतरीच्या कर्मांच्या हिशोबानुसारच घडत आहे. त्यात न्याय वा अन्यायाचा प्रश्नच येत नाही. एक साधु रस्त्याने जात होता. राजाचे सैनिक त्या साधुस पकडतात कारण त्यांना वाटते की राजमहालात झालेल्या चोरीला तो साधुच जबाबदार आहे. परिणामतः कारागृहात टाकले जाते. सात दिवसांनी जेव्हा खरा चोर पकडला जातो तेव्हा त्या साधुस कारागृहातून मुक्त केले जाते. साधु शांतपणे आपल्या मार्गाने जायला लागतो. साधुला जेव्हा पकडले तेव्हा त्याने काहीच प्रतिक्रिया व्यक्त केली नव्हती व कारागृहातून सोडल्यावर देखील तो साधु कोणास काही बोलला नाही. शांतपणे स्वतःचे मार्गक्रमण करू लागला. तेव्हा राजाने त्या साधुस अडवले व विचारले, 'मी तुला तुरुंगात टाकले तेव्हा तू काहीच बोलला नाहीस. तुरुंगातून सोडले तरी सुद्धा काही बोलला नाहीस. काहीतरी बोल.' तेव्हा साधू बोलला, 'हे राजन, मला माहीत आहे की, या जन्मात मी काहीच पाप केले नाही. चोरी तर लांबचीच गोष्ट आहे, तरी सुद्धा तुमच्या शिपायांनी मला पकडले व तुरुंगात टाकले. म्हणजेच हे माझ्या पूर्वीच्या कुठल्यातरी जन्मातले पाप असावे, असे मी समजलो. कारण कुठलीही परिस्थिती अशीच उगाचच येत नाही, आज आपल्याला कोणी त्रास देत आहे. दुःख देत आहे. तर का देत आहे? कारण आपला हिसाब-किताब जो सूक्ष्म राहिलेला आहे तो फेडला जात आहे. म्हणूनच येण्याऱ्या प्रत्येक परिस्थितीत कल्याण पहाण्यास शिकणे जरुरीचे आहे. कर्मयोगी जीवन अर्थात सकारात्मक भाव. जे घडले चांगले, जे घडत आहे खूप चांगले आणि जे घडणार आहे ते आणखी खूप चांगले. तुम्ही कुठपर्यंत दुःखी, उदास होत रहाणार? कुठपर्यंत विचार करीत बसणार की असे का झाले? माझ्याच बाबतीत का झाले? नको होते असे व्हायला. आता हे सारे सोडून द्या. प्रत्येक आत्म्याचा स्वतःचा पार्ट आहे. तो पार्ट पूर्ण झाल्यावर तो निघून जाणार. आपल्यापासून दूर जाणार.

एका घरात एक सुंदर बाळ जन्माला येते. दोन दिवसांनी डॉक्टर सांगतात की बाळाच्या हृदयात एक दोष आहे. ऑपरेशन करावे लागले. त्यासाठी जवळजवळ पाच लाखांचा खर्च होईल. आई-वडील गरीब, पैशांची खूपच चणचण, सर्व बाजूने कर्जात बुडालेले, कोठून आणणार इतके पैसे? घरदार, दागदागिने, शेतजमीन विकून पाच लाख रुपये जमा करतात. त्यानंतर मुलाचे ऑपरेशन केले. ऑपरेशनच्या दोन दिवसानंतर मुलाचा मृत्यू झाला. मुल का जन्माला आले होते? आईवडील कोणत्यातरी जन्मात त्याचे इतके पैसे घेऊन पसार झाले असतील आणि परत दिले नसतील. म्हणूनच आता तो आत्मा आला ना जन्माला. पैसे घेतले आणि गेला. आता सतत दुःखी होत रहाण्यात काय अर्थ? तो गेला. जेवढा हिसाब-किताब होता तो पूर्ण करून गेला. आता रडत बसण्यात काय फायदा? भक्तीमध्ये भक्त समजतात की जे काही होत आहे ते ईश्वराच्या इच्छेनुसार होत आहे. याला कारण म्हणजे ते कर्माची गुह्य गती जाणत नाहीत.

**आत्मअभिमानी स्थिती**

जे कर्म आत्मअभिमानी स्थितीमध्ये केले जाते ते कर्मयोगीचे कर्म. कर्मयोगी अर्थात आत्मअभिमानी स्थितीमध्ये स्थित होऊन कर्म करणारा. मी आत्मा आहे. आत्मिक दृष्टी, आत्मिक वृत्ती व आत्मिक स्थितीमध्ये स्थित राहून केलेले कर्म श्रेष्ठच असेल.

**शिवबाबांची आठवण**

शिवबाबांच्या सतत आठवणीत

राहून केलेले कर्म म्हणजेच कर्मयोग. कसे आठवणार शिवबाबांना? कर्म करताना परमेश्वराची कशी आठवण करणार? मी निमित्त आहे. कर्ताकरपिता शिवबाबा कर्म करवून घेत आहे. प्रत्येक कर्मास बाबांच्या आठवणीस जोडा. कोणतेही अगदी छोटे कर्मही आत्मिक स्थितीमध्ये वा बाबांच्या आठवणीत करणे. समजा आरशात पहातोय तर आत्म्यास भृकुटीमध्ये पहाणे. गाडी चालवत आहोत व रस्त्याने चालत आहोत. बाबांची किरणे छत्रछायेप्रमाणे पसरत आहेत. बोलायचय.. मी निमित्त मात्र. मला बोलवणारा शिवबाबा. भोजन बनवित आहात तर शिवबाबांसाठी भोजन बनवित आहे. धन कमवित आहात तर बाबांच्या सेवेसाठी धन कमावित आहात. स्नान करताना ''मी आत्मा शरीररुपी मंदीरात देवता आहे.' या मंदीराची स्वच्छता करीत आहे. रस्त्यातून चालत आहोत तर प्रत्येक पावलागणिक पद्म जमा होत आहे. मुरली ऐकताना 'गॉडली स्टुडंट' आहे असे समजून मुरली ऐकणे. प्रत्येक कर्माबरोबर स्वमान जोडा. एक तर आत्मअभिमानी स्थिति असेल किंवा शिवबाबांची आठवण. प्रत्येक आत्मा बाबांचा मुलगा आहे. मधुबनला जात आहोत तर स्मृती कोणती? परमेश्वरास भेटण्यास जात आहे. सेवाकेंद्रावर जात आहे तर कोणती स्मृती? ईश्वरीय विश्वविद्यालय मध्ये जात आहे. एक एक कर्मासाठी एक-एक स्वमान धारण करा.

**श्रीमतानुसार प्रत्येक कर्म**

कर्मयोगी अर्थात ज्याचे प्रत्येक कर्म श्रीमत अनुसार असेल. प्रत्येक कर्म श्रीमतास अनुकूल असले पाहिजे. नंतर असे नाही म्हणता येणार की मला माहीत नव्हते की हे श्रीमत आहे. चूक करायची नंतर म्हणायचे की मला माहीत नव्हते. त्यासाठी रोज मुरली ऐकणे अथवा वाचणे आवश्यक आहे. श्रीमत कुठून कसे मिळणार? मुरलीमधून आणि जे मुरली ऐकत नाहीत त्यांना श्रीमत ही मिळणार नाही. जे कधी-कधी मुरली ऐकतात ते अनेक ज्ञानबिंदू मिस करतात व त्याच कमजोर ज्ञानबिंदूवर परीक्षा प्रश्न येतो. पेपर येतो. गमतीची गोष्ट मधुबनमधील पांडवभवनमध्ये एकदा ब्रह्मा बाबांनी मुलांना आइस्क्रीम खायला दिले. सर्वांनी अगदी मजेत आइस्क्रीम खाल्ले. नंतर बाबांनी विचारले, आइस्क्रीम खाताना कोणी-कोणी शिवबाबांची आठवण केली? तर बरेच जण शिवबाबांची आठवण विसरून गेले होते. तात्पर्य म्हणजे भोजनसुद्धा शिवबाबांच्या आठवणीतच केले पाहिजे. भोजन बनवत आहात. तरी शिवबाबांची आठवण. पाणी पित आहात तरी शिवबाबांची आठवण. कोणतेही कार्य करीत आहात आत्मअभिमानी स्थिती असली पाहिजे तसेच प्रत्येक कर्म श्रीमतानुसारच केले पाहिजे.

**निमित्त भाव**

प्रत्येक कर्म करताना कधीही कुठलाही अहंकार नसावा की हे काम मी केले. मीच करू शकतो दुसऱ्यांना अजिबात जमणारच नाही. माझ्याशिवाय कोणीही हे काम करुच शकणार नाही. याऐवजी प्रत्येक कृतीमध्ये, कार्यामध्ये निमित्तभाव. निमित्त भाव अर्थात शिवबाबा माझ्याकडून करवून घेत आहे. तो परमेश्वर हे कार्य कोणाकडून ही करवून घेऊ शकतो. त्याला वाटले तर तो आपल्याला डावलून, कोणा दुसऱ्यास ही हे काम देऊ शकतो. परंतु त्याने मला हे कार्य दिले यातच माझे केवढे भाग्य! ही सेवा मला मिळाली हेच थोर भाग्य!

कर्मयोगी जीवनात हे वरील सर्व सात बिंदू निस्वार्थ कर्म, अनासक्त भाव, सकारात्मक भाव, आत्मअभिमानी स्थिती, शिवबाबांची आठवण, श्रीमतानुसार प्रत्येक कर्म व निमित्त भाव असतील तर ते जीवन अतिशय सुखकारक होईल.

भावानुवाद ब्र. कु. हेमा, ठाणे (पू.)

***

**आपण विश्वकल्याणकारी मुले ज्ञानस्वरुप आहोत. त्यामुळे जर कोणी चुकीचे वागत असेल तर त्याला चुकीचे म्हणायला हरकत नाही. परंतु त्याची चुकीची गोष्ट मात्र आपल्या मनात ठेऊ नका. कुठलीही चुकीची गोष्ट आपल्या वृत्तीत ठेवली तर आपली दृष्टी व सृष्टी बदलून जाईल आणि मनाच्या वृत्तीत जर वाईट गोष्टी व व्यर्थ विचार असतील तर मग विश्वकल्याणकारी कसे बनाल?**



# जेथे जाते तेथे, शिवबाबा सांगाती (अनुभव)

**ब्र. कु. भटावाई चौधरी, धरणगाव**

मी सन १९९२ मध्ये या संस्थेच्या संपर्कात आली. सध्या माझ्या शरीराचे वय ७३ वर्षे आहे. मला संस्थेच्या सेवाकेंद्रावर ईश्वराविषयीचे सत्य ज्ञान तसेच संस्थेच्या कार्याची सविस्तर माहिती प्राप्त झाली. साप्ताहिक कोर्स केल्यानंतर मी नियमितपणे क्लासला जाऊ लागली. रोज मुरली ऐकून मला पूर्णपणे ईश्वरीय ज्ञान समजले. फलस्वरुप दिवसेंदिवस माझा आनंद वाढत गेला. त्यामुळे आपोआपच ईश्वरीय ज्ञानाची धारणा व मर्यादांचे पालन होत गेले.

एक वर्षाचा कालावधी लोटल्यानंतर मला शिवबाबांच्या भेटीसाठी माऊंट आबूला जाण्याची सुवर्णसंधी प्राप्त झाली. मी अत्यानंदाने माऊंट आबूला गेली. तेथील अनुभव इतका चांगला होता की त्याचे शब्दात वर्णन करणे मला अशक्य आहे. अव्यक्त बापदादांशी मीलन व एवढा मोठा ईश्वरीय परिवार पाहून मी भारावून गेले. तेथे मला अतींद्रिय सुख व शांतीचा अनुभव प्राप्त झाला. जन्मोजन्मी केलेल्या भक्तीचे फळ मला ईश्वर प्राप्तीच्या रुपाने लाभले होते. खरोखर मी (आत्मा) धन्य-धन्य झाले होते. त्यामुळे दरवर्षी मधुबन पावन भूमीत येऊन एक महिना सेवा करण्याचा संकल्प मी केला व बरीच वर्षे त्यानुसार आचरणही केले. या बेहद्द सेवेविषयी माझा अनुभव असा आहे की त्यामुळे तन, मन, धन, समय, श्वास व संकल्प सफल होत गेले. फलस्वरुप बेहद पुण्य जमा होत गेले. अर्थातच त्यामुळे पुढील अनेक जन्मासाठी सद्भाग्य जोडले गेले. मागील २७ वर्षाच्या अलौकिक जीवनात मला शिवबाबांच्या मदतीचे अनेक अनुभव प्राप्त झाले. त्यातील काही निवडक अनुभव मी आपल्यापुढे मांडणार आहे. मला खात्री आहे की ते नक्कीच आपल्याला आवडतील.

सन १९९५ मधील हा प्रसंग आहे. मी शेतात एकटीच शिवबाबांच्या आठवणीत गवत काढण्याचे काम करत होती. अचानक दुपारच्या वेळी माझ्या डाव्या हाताच्या बोटाला जंगली विंचवाने चावले. तेव्हा मी माझ्या उजव्या हाताला बांधलेला राखीचा धागा तोडून त्या बोटावर बांधला तसेच मनगटावर एका सुतळीने घट्ट बांधले. नंतर मी शिवबाबांची आठवण करून म्हटले, 'बाबा! आता इतके काम शिल्लक आहे, ते कोण करेल?' असे म्हणत-म्हणत संध्याकाळपर्यंत मी काम करतच राहिली. तोपर्यंत डाव्या हाताच्या बोटांना खूप सूज आली होती आणि हात ही दुखत होता. संध्याकाळी घरी आल्यावर मी ही घटना सांगितली. परंतु कोणीही माझ्या बोलण्यावर विश्वास ठेवायला तयार नव्हते. कारण इतक्या दुखावलेल्या हाताने काम करणे अगदी अशक्य आहे, असा त्यांचा समज होता. त्यानंतर मी रोजच्या प्रमाणे संध्याकाळी सेवाकेंद्रावर मुरली ऐकण्यासाठी गेले. तेथे गेल्यावर शिवबाबांना अतिशय स्नेहपूर्वक सांगितले, 'बाबा! आतापर्यंत हे दुखणे मी खूप सहन केले. आता मात्र आपणच कोणत्याही प्रकारे ते दूर करावे. आपली महिमा तर नीलकंठेश्वर अशी आहे. त्यामुळे माझ्या हातातील विष काढण्याकरिता मी अन्य ठिकाणी कुठे जाणार नाही.' त्यानंतर मुरलीतील एक-एक महावाक्य हे महामंत्राप्रमाणे ऐकत-ऐकत सूज आलेल्या बोटावर स्नेहाने हात फिरवत राहिली आणि आश्चर्य म्हणजे एका तासात हाताची सूज व दुखणे कमी होत गेले व हात

पूर्ववत झाला. ही होती सारी शिवबाबांची कमाल! या प्रसंगामुळे शिवबाबांविषयी माझ्या मनात असलेले प्रेम व विश्वास अधिकच दृढ झाला.

शिवबाबा मुरलीत पुष्कळदा सांगतात की, 'मुलांनो, तुम्ही माझी कोठेही मनापासून आठवण करा, मी एक सेकंदात तुमच्या सेवेत हजर राहीन.' या महावाक्याचा अनुभव तर मी खूप वेळा केला. आपणही सर्व ब्रह्मावत्स करीतच असाल.

दुसरा एक विशेष अनुभव नमूद करावासा वाटतो. मी दरवर्षी ठरविल्याप्रमाणे मधुबनला सेवेसाठी गेले असतांनाचा हा अनुभव आहे. एक माता सेवेचा कालावधी पूर्ण होण्याआधीच मधुबनहून घरी जायला निघाली होती. मी उत्सुकतेने तिला विचारले, 'माताजी, तुम्ही मध्येच घरी का चाललात?' तेव्हा त्या म्हणाल्या की 'मी खाली बसून कणिकेचे गोळे बनवू शकत नाही जास्त वेळ खाली बसल्याने माझ्या पायांना सूज येते.' ती माता घरी गेल्यावर तिच्या सेवेची जबाबदारी मला देण्यात आली. तेव्हा मी शिवबाबांना मनापासून सांगितले की, 'बाबा, त्या मातेप्रमाणे मला त्रास व्हायला नको. मला पूर्ण महिनाभर सेवा करायची आहे. त्यामुळे आपण मला इतकी शक्ती द्या जेणेकरून मी सेवा करु शकेन.' रोज मी शिवबाबांच्या आठवणीत सेवा करीत होते. एक दिवस मला असा अनुभव आला की वरून माझ्या पायावर शक्तीची किरणे येत आहेत व मला एकदम हलकेपणा जाणवत आहे. तात्पर्य म्हणजे जर खरोखर मनापासून व निस्वार्थपणे सेवा करण्याची आपली इच्छा असेल तर शिवबाबांची आपल्याला वेळोवेळी खूप मदत मिळत असते.

तिसरा एक अनुभव फेब्रुवारी २०१९ चा आहे. माझ्या मुलाचा परिवार तळ मजल्यावर रहात होता व मी पहिल्या मजल्यावर रहात होती. त्यामुळे माझी दिनचर्या ईश्वरीय नियमानुसार व्यवस्थित चालू होती. एके दिवशी मी अमृतवेळेचा योग करण्यासाठी सकाळी ४ वाजता उठली. ४ ते ५ योग झाल्यानंतर मी स्नान करण्यासाठी बाथरुममध्ये निघाली आणि बाथरुममध्ये पाय घसरुन बेशुद्ध पडली. सुमारे एक तासानंतर मला शुद्ध आली. त्यावेळी प्रथम मी शिवबाबांची आठवण केली व नंतर खालच्या मजल्यावर रहात असलेल्या मुलाला जोरजोरात आवाज देऊ लागली. सुदैवाने माझा मुलगा आज कामावर गेला नसल्याने, तो घरीच होता. हा देखील कल्याणकारी ड्रामाच होता. नाही तर माझा मुलगा रोज सकाळी ५ वाजता कामावर निघून जातो. माझी हाक ऐकून मुलगा धावत-धावत वर आला. परंतु माझा दरवाजा मात्र बंद होता. तेव्हा कशी तरी घसरत मी दरवाज्यापर्यंत गेली व दरवाज्याची कडी काढली. माझा आवाज ऐकून शेजारी-पाजारीसुद्धा गोळा झाले होते. त्यांनी मला उचलून खाली आणले व हॉस्पिटलमध्ये ॲडमिट केले. अशा प्रकारे हॉस्पिटलमध्ये मी आयुष्यात पहिल्यांदाच ॲडमिट झाली होती. डॉक्टरांनी लगेचच योग्य त्या तपासण्या करून ट्रीटमेंट सुरु केली.

मी हॉस्पिटलमध्ये दाखल झाल्यावर मला भेटण्यासाठी बरेच नातेवाईक येऊ लागले. याला मुख्य कारण म्हणजे माझ्या नातवाचे लग्न केवळ ८ दिवसांनी होणार होते. घरी लग्नाची तयारी जोरात चालू होती. अशा परिस्थितीत मी जर हॉस्पिटलमध्ये राहिले तर लग्नात एक प्रकारचे विघ्न येणार होते. सर्वांच्या आनंदावर विरजण पडणार होते. तेव्हा मी असा विचार केला की काहीही झाले तरी आपण असे विघ्नस्वरुप बनता कामा नये. तेव्हा मी दुःखहर्ता, सुखकर्ता शिवबाबांना अगदी मनापासून सांगितले की, 'बाबा, माझ्यामुळे शुभकार्यात कुठलेही विघ्न पडू देऊ नका. मला लवकर बरे करा.' त्याचबरोबर हॉस्पिटलमधील डॉक्टरांना सुद्धा विनंती केली की मला लवकरात लवकर बरे करा. मला घरच्या शुभकार्यात विघ्नरुप बनायचे नाही. हे ऐकून डॉक्टरांनाही आश्चर्य वाटले. कारण त्यांना माहित होते की या मातेला अर्धांगवायुचा झटका आला आहे. अशा परिस्थितीत सुद्धा ही माता घरच्यांचा किती विचार करते. हिच्या मनात परिवाराविषयी किती प्रेम व आपुलकी

आहे. त्यामुळे डॉक्टरांनी देखील खूप चांगली ट्रीटमेंट दिली व मला केवळ ४ दिवसात डिसचार्ज दिला. नंतर पुढे माझ्या नातवाचे लग्न निर्विघ्नपणे व मोठ्या आनंदाने पार पडले. तात्पर्य म्हणजे अविनाशी आत्मिक सर्जन शिवबाबांच्या आशिर्वादाने तसेच डॉक्टरांच्या औषधाने मी आज पूर्णपणे स्वस्थ जीवन जगत आहे. वास्तविक ही सगळी शिवबाबांची कमाल आहे कारण अर्धांगवायूचा आजार (पॅरालिसिस) इतक्या थोड्या दिवसात बरा होत नाही. त्यामुळे माझ्या सर्वच नातेवाईकांना याचे फार आश्चर्य वाटले. फलस्वरुप त्यांचा ईश्वरीय ज्ञानावरील विश्वास वृद्धींगत झाला. सर्व जण हेच म्हणतात की शिवबाबांनीच तुम्हाला चांगले केले. **त्यांना मी हेच सांगते की माझा बाबा वैद्यनाथ आहे. त्याची ज्ञानमुरली ही जणू संजीवनी बुटी आहे. तसेच त्याने शिकविलेला राजयोग आत्म्याला सदा 'हेल्दी, वेल्दी व हॅपी' बनविणारा आहे.**

आपण हे जाणतो की संगमयुगाचा समय आता संपत आला आहे. कधी कुणाचे काय होईल, हे सांगता येत नाही. त्यामुळे आपण प्रत्येकाने अतिशय दृढतापूर्वक पुरुषार्थ करण्याची आवश्यकता आहे. याचेच गायन आहे - 'बहुत गयी, थोडी रही, अब थोडी की भी थोडी रही।' त्यामुळे प्रत्येक ब्रह्मावत्साने रोज किमान २-३ वेळा मुरलीचे वाचन, मनन-चिंतन केले पाहिजे. त्याद्वारे आपण अंतिम समयी 'नष्टोमोहा स्मृतीस्वरुप' बनू. त्यासाठी मी रोज सकाळी ७ वाजता मुरली वाचते, नंतर दुपारी, संध्याकाळी ५ च्या क्लासमध्ये ऐकते व ८ वाजता जो मातांचा क्लास असतो, त्यामध्ये मुरली वाचते. त्यामुळे एक तर माझा वेळ सफल होतो व दुसरी गोष्ट म्हणजे मज आत्म्याला खुशीचा खुराक मिळतो. दिवसभर हे सगळ केल्याशिवाय मला बरच वाटत नाही. कित्येकांना हा प्रश्न पडतो की म्हातारपणी नुसत बसून काय करायच? ते नुसते बोअर होऊन जातात. जास्तीत जास्त वेळ ते टी. व्ही. समोर बसून रहातात किंवा पेपर वाचत बसतात. **वास्तविक त्यांना मिळालेला समय हा जर त्यांनी ईश्वरीय कार्यात सफल केला तर त्यांचे किती थोर भाग्य बनेल! त्यासाठी त्यांनी कुठल्याही ब्रह्माकुमारीज् सेवाकेंद्रावर जाऊन ईश्वरीय ज्ञान व सहज राजयोगाचे शिक्षण अवश्य घ्यावे. हीच त्यांना कळकळीची विनंती आहे.**

सर्वात महत्त्वाची गोष्ट म्हणजे जेव्हा आपण शिवबाबांच्या श्रीमतानुसार आचरण करतो तेव्हा आपल्याला शिवबाबांकडून वेळोवेही मार्गदर्शनपर संकेत (टचिंग) मिळत जातात व त्यानुसार आपण कार्य करीत जातो. फलस्वरुप जीवनात प्रत्येक गोष्टीत आपल्याला सफलता प्राप्त होत जाते. याचेच गायन केले जाते - **'जेथे जातो तेथे, तू माझा सांगाती। चालविसी हाती धरोनिया।' आपण सर्व ब्रह्मावत्स याचा अनुभव तर करीत आहोतच. आता आपल्या संबंध संपर्कातील सर्वांना शिवबाबांचा परिचय देऊन, त्यांनाही अनुभवी बनवू या.**

***

---

**(पान क्र. २१ वरून)**

जन्मातच) चुक्त करायचे वा फेडायचे आहे. त्यामुळे कुठल्याही व्यक्तीला अथवा परिस्थितीला दोष न देता, आपल्याच पूर्वकर्माचे हे फळ आहे असे समजून, सदैव शांत व योगयुक्त स्थितीत रहायचे आहे. या अनुषंगाने अव्यक्त वाणीतील शिवबाबांची पुढील महावाक्ये लक्षात ठेवा, **''मीठे बच्चे, ६३ जन्मों के हिसाब-किताब यहाँ ही चुक्तू होने है। अपने पिछले संस्कार, स्वभाव बाहर इमर्ज हो, सदा के लिए समाप्त हो रहे है। इस कर्मों की गुह्य गति को न जान घबरा जाते हो। याद रखो अभी तुम बाप के बने हो तो ऐसा कोई कर्म नही करना है, जिससे बाप की निंदा हो। सत्गुरु का निन्दक ठौर न पाये। ईश्वर की सन्तान होकर आसुरी कर्म से डरना चाहिए। जो बात अच्छी न लगे वह करनी नही चाहिए। अब अच्छी रीति पुरुषार्थ कर कर्मातीत बनना है।**

***



उद्गीर : मा. भ्राता सुधाकर भालेराव (आमदार) यांना राखी बांधतांना ब्र. कु. महानंदा दीदी.



पुणे (क्वार्टर गेट) : पोलिस आयुक्त मा. भ्राता वेंकटेशम् यांना राखी बांधतांना ब्र. कु. अरुणा बहेन.



मलकापूर (कोल्हापूर) : नगराध्यक्ष श्री. केसरकर, उपनगराध्यक्ष श्री. पाटील व अन्य अधिकाऱ्यांना राखी बांधतांना ब्र. कु. वंदना व वर्षा बहेन.



मालाड (जनकल्याण नगर) : आमदार भ्राता अस्लम शेख यांना राखी बांधताना ब्र. कु. मीना बहेन.



वर्धा : ब्र. कु. माधुरी बहेन यांना स्मृतीचिन्ह प्रदान करून, सन्मान करतांना खासदार श्री. रामदास तडस.



सांताक्रुझ (मुंबई) : सुप्रसिद्ध गायक श्री. सुरेश वाडकर यांना राखी बांधतांना ब्र. कु. विनिता बहेन.



पूर्णा (आनंदनगर) : 'शाश्वत यौगिक शेती व तनावमुक्त जीवनशैली' या विषयी ६५ गावातील लोकांना मार्गदर्शन करतांना ब्र. कु. प्रणिता दीदी, शेजारी अधिकारी वर्ग.




अहमदनगर : १५१ वर्ल्ड रेकॉर्ड बनविल्याबद्दल ब्र. कु. डॉ. दीपक हरके यांना 'इंडिया स्टार पॅशन अवॉर्ड २०१९' प्रदान करतांना अभिनेत्री व सांसद हेमामालिनी.

Registration No. : MAHMAR/2007/21914



दिल्ली : भारताचे पंतप्रधान मा. भ्राता नरेंद्र मोदीजी यांना पावन राखी बांधतांना राजयोगिनी आशा बहेन, सोबत ब्र. कु. फाल्गुनी बहेन व ब्र. कु. दिव्या बहेन.



पणजी (गोवा) : गोव्याच्या राज्यपाल श्रीमती मृदुला सिन्हा यांना रक्षासूत्र बांधतांना ब्र. कु. शोभा बहेन.



सायन (मुंबई) : महाराष्ट्राचे मुख्यमंत्री मा. भ्राता देवेंद्र फडणवीस यांना राखी बांधतांना ब्र. कु. माला बहेन.



वाशी (मुंबई) : केंद्रीय भुपृष्ठ वहातुक मंत्री मा. भ्राता नितीन गडकरी यांना ईश्वरीय भेटवस्तू प्रदान करतांना ब्र. कु. शीला बहेन व ब्र. कु. कुंती बहेन.